रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ३४४ ▌पृष्ठे १० ▌ RGD/016/2026-28 www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २३ मे २०२६

किंमत ४ ₹

## रायगडात अवकाळी पावसाची हजेरी

**रायगड :** रायगड जिल्ह्यात हवामान विभागाकडून अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार शुक्रवारी रायगडातील काही भागात अवकाळी पाऊस पडल्याने हवामान विभागाचा अंदाज खरा ठरला. शुक्रवारी दुपारनंतर मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस पडला. हवामानात झालेल्या बदलांमुळे मेघगर्जना विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली होती. त्यानुसार रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसाच्या सरी बरसल्या. जिल्ह्यात महाड, माणगाव, •> पान ५ वर

## बंदी काळात मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई

**अलिबाग :** पावसाळ्यात दोन महिने १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारीस बंदी घालण्यात आली आहे. या ६१ दिवसांच्या पावसाळी बंदी काळात संबंधित नौकांनी समुद्रात मासेमारी करू नये, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां) संजय पाटील यांनी केले आहे. बंदी काळात मासेमारी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. ही बंदी केवळ यंत्रचलित आणि यांत्रिक मासेमारी नौकांसाठी लागू राहणार असून, पारंपरिक पद्धतीने •> पान ५ वर

## परप्रांतीय तरुणाची आत्महत्या

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील मानी येथील एका खोलीमध्ये १८ वर्षीय परप्रांतीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्याचा मृतदेह सायंकाळी अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, रबी सरकार असे या तरुणाचे नाव आहे. हा तरुण मूळचा कोलकाता येथील रहिवासी आहे. गेल्या काही दिवसांपासून तो मानी परिसरातील एका चायनीजच्या दुकानात कामासाठी आला होता. मालकाने दिलेल्या एका खोलीमध्ये तो राहात होता. शुक्रवारी दुपारी जेवण झाल्याव तो त्या खोलीमध्ये झोपण्यासाठी गेला होता. सायंकाळी साडेतीननंतर तो कामावर पुन्हा •> पान ५ वर

# पात्र मतदार सुरक्षित

- २००२ च्या मतदार यादीशी तपासणी करा
- राज्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांचे आवाहन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात राबविण्यात येणारी विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने होणार असून, कोणत्याही पात्र मतदाराचे नाव विनाकारण वगळले जाणार नाही, असे स्पष्ट आश्वासन महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिले. तसेच



नागरिकांनी २००२ सालच्या मतदार यादीशी आपले किंवा आपल्या पालकांचे नाव जुळते का, याची खातरजमा करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेची घोषणा केली असून, या अंतर्गत राज्यातील तब्बल ९ कोटी ८६ लाखांहून अधिक मतदारांच्या तपशीलांची घराघरांत जाऊन पडताळणी केली जाणार आहे. या प्रक्रियेवर महाविकास आघाडीकडून आक्षेप घेतल्यानंतर निवडणूक •> पान ५ वर

> “राज्यात तब्बल ९ कोटी ८६ लाखांहून अधिक मतदार आहेत. कोणत्याही पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही. प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शकपणे राबवली जाईल. नागरिकांनी २००२ च्या मतदारयादीत आपले किंवा पालकाचे नाव जुळवून पाहावे. – एस. चोकलिंगम”

### मतदार पुनरीक्षण मोहिमेचे वेळापत्रक

- २० ते २९ जून २०२६ : गणना अर्जांची छपाई व बीएलओ प्रशिक्षण.
- ३० जून ते २९ जुलै २०२६ : घराघरांत जाऊन अर्ज वितरण व संकलन
- ५ ऑगस्ट २०२६ : प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध
- ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ : दावे व हरकती स्वीकारल्या जाणार
- ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत : दावे–हरकतींची छाननी व निर्णय घेण्यात येईल.
- ७ ऑक्टोबर २०२६ : अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.




# टँकरमुक्त रायगडच्या घोषणा हवेतच

### ६४ टँकरवर जिल्ह्याची तहान भागवण्याची वेळ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

‘टँकरमुक्त रायगड’चे दावे करणाऱ्या प्रशासनाचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले असून, उन्हाळा तीव्र होताच जिल्ह्यातील हजारो नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. जिल्ह्यातील ६४ गावे आणि २३० वाड्यांमधील तब्बल १ लाख १३ हजार ७०९ नागरिकांना सध्या ६४ खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट जाहीर करण्यात आले होते. मात्र, रायगड जिल्ह्यातील अनेक भागांत अजूनही टँकरची गरज भासत असल्याने जलजीवन योजना प्रत्यक्षात कितपत यशस्वी झाली, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सर्वाधिक गंभीर •> पान ५ वर

## वादातून पत्नीचा पतीच्या गुप्तांगावर चाकूहल्ला

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कौटुंबिक वादाचा राग मनात धरुन एका ३१ वर्षीय विवाहितेने आपल्या पतीच्या गुप्तांगावर चाकूने वार करुन त्याला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना तळोजा येथे उघडकीस आली आहे. या विवाहितेने आपल्या सासूच्या चेहऱ्यावरदेखील गरम पाण्यासारखे रासायनिक द्रव्य ओतून तिला दुखापत करुन पलायन केले आहे. तळोजा पोलिसांनी या घटनेनंतर फरार झालेल्या विवाहितेवर •> पान ५ वर

# रोबोटीक बोयो ठरला देवदूत!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

उन्हाळी सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी आलेला पर्यटक समुद्रात बुडण्याच्या प्रयत्नात होता. मात्र, रोबोटीक बोयो या यंत्राच्या मदतीने पर्यटकाला सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. स्थानिक प्रशासन व पोलीस प्रशासनाचे यामध्ये मोलाचे योगदान राहिले. ही घटना शुक्रवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घडली. रोबोटीक बोयो देवदूत ठरल्याची प्रतिक्रिया उमटत असून, आतापर्यंत तीनहून अधिक पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.




काशीद समुद्रात बुडणाऱ्या तरुणीचा वाचविला जीव


मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथील रहिवासी असलेले आकाश साबळे आणि सिद्धी साबळे हे आपल्या कुटुंबासह काशीद समुद्र किनाऱ्यावर पर्यटनासाठी आले होते. हे कुटुंब पोहण्यासाठी पाण्यात उतरले. परंतु, पाण्याचा अंदाज न आल्याने सिद्धी साबळे •> पान ५ वर


P.P. KHARPATIL EDUCATION SOCIETY
P.P. KHARPATIL EDUCATION SOCIETY PPKES WE, FOR THE PEOPLE
CHIRNER.
TEACHERS REQUIRED
Applications are invited for the post of teachers in
P.P. KHARPATIL EDUCATION SOCIETY.
Interested candidates should apply for above with hand written application & necessary documents.
QUALIFICATION
- M.sc. M.ed.
- M.Com M.ed.
- B.sc. B.Ed.
- B.A. B.Ed.
- M.A. B.ed.
- B.Com. B.ed , ATD,
SUBJECTS REQUIRED
English | Marathi | Mathematics | Science | Social Science | Other Subjects
IMPORTANT INFORMATION
✓ Preference will be given to experienced and qualified candidates.
✓ Only short-listed candidates will be called for interview.
✓ Bring original documents at the time of interview.
Secretary
P.P. KHARPATIL EDUCATION SOCIETY
For More Details CONTACT :
9223306565, 8605991659, 9867852665, 8268974128

PNP CYRUS POONAWALLA SCHOOL
NAGAON CBSE CURRICULUM (SINCE 2017)
LEARNING,GROWING, THRIVING, TOGETHER,
ADMISSION OPEN NURSERY TO X
Located in a non-industrial, nature-friendly setting, the school provides a calm and healthy atmosphere that supports focused learning and overall well-being.




HOLISTIC DEVELOPMENT
The institution places clear emphasis on the holistic development of students, ensuring equal importance to academics, physical fitness, and life skills.





SWIMMING FOR ALL
A major highlight is the half Olympic-length swimming pool, where free swimming classes are provided to all students, promoting fitness and confidence from an early age.
Best Sports Facilities in Alibag
In addition, the school boasts extensive sports facilities, including a basketball court, tennis court, and a football ground, giving students opportunities to actively engage in sports and develop teamwork, discipline, and leadership.



9822771540/9272594803/9168137591
pnpedusoc@gmail.com www.cyruspoonawallaschool.com
Opp. Hiranandani Sands, Near Mahendra Colony, Nagaon Khari Rd, Nagaon Village, Taluka, Alibaug, District. Raigad - 402204.

# टंचाईग्रस्त गाव-वाड्यांना पाणीवाटप




। कर्जत । प्रतिनिधी ।

सद्भाव फाऊंडेशन मुंबई, कर्जत व खालापूर तालुक्यात अनेक समाजउपयोगी उपक्रम राबवित असतात. त्याचाच एक भाग म्हणून पाणी टंचाईग्रस्त वाड्यांना व गावांना पिण्याच्या पाण्याचे मोफत वाटप एप्रिल महिन्यापासून सुरू आहे. तसेच, सद्भाव फाऊंडेशनच्या वतीने तालुक्यात अवेअरनेस शिबीर, कॅन्सरवर मार्गदर्शन शिबीर, महिला बचतगट असे अनेक समाजउपयोगी उपक्रम राबविले जातात.

उन्हाळ्यात तालुक्यातील अनेक वाड्यांना व गावांना पाणी टंचाई जाणवते. फाऊंडेशनच्या वतीने १७ वाड्यांना व गावांना यामध्ये चोचीवाडी, पट्टीची ठाकुरवाडी (उंबरवाडा)आनंदवाडी, खांदन, पिंगळस, पोखरकरवाडी, वडाचीवाडी, पाधीरवाडी, टेपाचीवाडी, मेंगाळवाडी, जांभुळवाडी, वरणे ठाकुरवाडी, पळसदरी वाडी, ईस्टुलवाडी, ठाकूरवाडी, जांभुळवाडी, झुगरेवाडी या गावातील वाड्यांना टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सद्भाव फाऊंडेशनच्या ट्रस्टी मा. नीता दोषी यांसह फाऊंडेशनच्या कर्जत प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड व प्रगती पाटील, प्रतिक्षा दगडे, संतोष ढाकवळ यांचाही यामध्ये मोलाचा वाटा आहे.

**● सद्भाव फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम**

## भगव्या शक्तीचा विराट जागर

**उरण :** उरणमध्ये सकळ हिंदू समाज उरण यांच्या वतीने रविवार दि.२४ मे रोजी भव्य 'विराट हिंदू संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. हिंदू एकता, देशभक्ती आणि हिंदू धर्मप्रबोधनाचा संदेश देणारे हे संमेलन उरण नगर परिषद मराठी शाळा मैदान, पेंशन पार्कजवळ सायंकाळी ५.३० ते रात्री ९.३० या वेळेत पार पडणार आहे. संमेलनाची सुरुवात भव्य दिंडी आणि भगव्या मिरवणुकीने होणार असून, त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रभक्तीपर सादरीकरणे आणि हिंदू धर्मजागृतीचे विविध उपक्रम पार पडणार आहेत.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | M/s. Suyash Pets. Clinic Shop No. 1 Bldg. No. 88 Vrushali Villa Chs Ltd; Tilaknagar, Chembur Mumbai 400 089 | ०१ गुलमोहर व ०१ सावर अशी एकूण ०२ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ७२ एच, सेक्टर-११, खारघर, ता. पनवेल जि. रायगड येथे भूखंडाच्या आवारातील ०२ झाडे नवीन इमारत बांधकामात बाधित होत आहे. |
| २. | M/s. R.G. Steel Traders LLP, Plot No. C-29, MIDC Taloja, Village Tondare Tal-Panvel | ०४ अशोक, ०२ आंबा व ०१ उंबर अशी एकूण ०७ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Plot No. C-29, Taloja MIDC, Village Tondare, Tal-Panvel येथे भूखंडाच्या आवारातील ०७ झाडे नवीन इमारत बांधकामात बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण करणेस परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावेत. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
उपायुक्त
तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. PMC-PARK/216/2026-PTAD

### MAHATRANSCO — E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-12/ 26-27/ Rfx No. 7000040019 | AMC of the maintenance of (SCHRACK SECONET Make) fire detection and the Alarm system at 400 kV Nagothane substation under 400 kV RS O&M Div. Nagothane | Limited to Rs. 4,00,000 /- | 05.06.2026 up to 23.59 hrs |

**EMD:** Rs. 5000/-, **Tender fee:** Rs. 500/- + GST. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) **Mob No.:** 9461456635 **Email ID:** ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे.** ठिकाण : झिराड, पात्रता- MBA अनुभव- ३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना + इन्सेटिव्ह. Contact- 9823585321

● **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी** आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात.संपर्क: ९९२३७५०५४९ वेळ: सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत

● **दिशा पॅथॉलॉजी लॅब अलिबाग व चोंढी** येथे कामासाठी मुले/मुली पाहिजे (अनुभवी/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९

● **jai santoshi maa CNG Alibag** wadgav 1) Filler-man 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) गोपीनाथ देहू देशमुख २) मनोहर देहू देशमुख ३) प्रतिक दत्तात्रेय साठे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४८ | २ | ०-४१-३० पैकी खरेदी करणेचे क्षेत्र ०-१७-०० | ०-२८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २३/०५/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे नारवेल, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनांच्या मिळकती असुन सदर मिळकतींचे विद्यमान मालक/कब्जेदारांपैकी १. नागुबाई बाळाजी म्हात्रे, २. सावित्री रामकृष्ण म्हात्रे, ३. सुगंधा सुनील पाटील, ४. मंजुळा दत्ताराम लोलम, ५. मंजिरी मिलींद पाटील, ६. सुवर्णा संदीप पाटील यांच्या हिस्स्याच्या क्षेत्राची मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**
**मौजे - नारवेल, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १. नागुबाई बाळाजी म्हात्रे<br>२. सावित्री रामकृष्ण म्हात्रे<br>३. सुगंधा सुनील पाटील<br>४. मंजुळा दत्ताराम लोलम<br>५. मंजिरी मिलींद पाटील<br>६. सुवर्णा संदीप पाटील | ७८ | १ | ०-२१-५० पैकी ०-२०-०० | २.८० |
| ७. कांचन विठोबा म्हात्रे<br>८. समीर विठोबा म्हात्रे<br>९. श्वेता विठोबा म्हात्रे | १८३ | १ | ०-४०-७० पैकी ०-३०-७० | २.४८ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा- कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १. नागुबाई बाळाजी म्हात्रे, २. सावित्री रामकृष्ण म्हात्रे, ३. सुगंधा सुनील पाटील, ४. मंजुळा दत्ताराम लोलम, ५. मंजिरी मिलिंद पाटील, ६. सुवर्णा संदीप पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. २३/०५/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे -झिराडपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ६६, क्षेत्र १-१९-९० हे. आर, पो. ख. ०-०९-१० हे. आर., एकूण क्षेत्र १-२९-०० हे.आर., आकार २८.५० रू.पैसे, या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०६-०० हे.आर. आकार १.४३ रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक कल्पना मुकेश कोळी यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख २२/०५/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली शेती मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काची पडताळणी करून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे रावतळी, ता. महाड, जि. रायगड.**

| नाव | गट व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| धमीर तौफिरऊल शेख | ४४९ | ०-२८.०० | ०-०५ |
| | | ०-१७.०० | |
| | एकुण | ०-४५.०० | |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आम्ही सदरहू मिळकतीची वरीलप्रमाणेचे मालकी हक्काची पडताळणी पूर्ण करु व मिळकत बोजारहीत असल्याचे स्पष्ट झाल्यास त्याबाबत मालकी हक्काचा दाखला देण्याची तजविज करु व त्यानंतर आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२२/०५/२०२६

**(योगेश एस. बाष्टे)**
वकील.
पत्ता : फ्लॅट नं. ७, तळ मजला, जय नारायण बिल्डींग,
गावदेवी मंदीर जवळ, ता. पनवेल, जि. रायगड
४१०२०६. फोन नं. ८८९८१२१९७१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे रानसई, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सदानंद महादेव मोरे यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे आर. प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ९१ | १/अ/५ | ०.२९.७० | ३.७५ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३ पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड.मो.नं.७७९८४३३८८८

सही/-
**ॲड. कैलास अनंत बासरे**

दिनांक : २३ मे २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मौजे हेदवली | १६ | १ | १-०७-०० | ० | ९९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २३/०५/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-भिसे, ता.- रोहा, जि.- रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./ भू.क्र | एकूण क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| गणेश सखाराम कुथे | १११ | ला. योग्य ०-६७-५०<br>पो.ख. ०-०३-३०<br>एकूण ०-७०-८० | १७.७५ |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

-सही-
**ॲड. सोनाली गंगाधरे शहासने**
''सीता-सदन'' वाकण, पो.- पाटणसई,
ता.- रोहा, जि.- रायगड, ४०२१०६
मो. क्र. ७७७५८९०४५५

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
**ई-निविदा आमंत्रण सूचना**

सादर सेवा

प्रधान मुख्य अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे सिंगल बिड प्रणाली अंतर्गत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी खुली निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी विभागांतर्गत एईएन/रत्नागिरी सेक्शनमधील शिंदे अंबेरी बोगद्यात ट्रॅकचे थ्रू डीप स्क्रीनिंग तसेच स्लीपर नूतनीकरण करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2026-03. अंदाजित किंमत:** रु. 2,97,20,399/- जीएसटी वगळून. **बंद होण्याची दिनांक/वेळ:** 15.06.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** पाच महिने मान्सून सह. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. दुरुस्तीपत्रक/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
**निविदा सूचना**

सादर सेवा

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी येथील वरिष्ठ विभागीय सिग्नल व दूरसंचार अभियंता यांच्या वतीने अनुभवी कंत्राटदारांकडून "करंजाडी सायडिंग येथे आयपी आधारित व्हिडिओ सर्व्हेलन्स सिस्टम (सीसीटीव्ही) पुरवठा, प्रतिष्ठापन व कार्यान्वयन तसेच कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील चिपळूण स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. 3 जवळील फिरत्या क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरा प्रणालीची व्यवस्था करणे" या कामासाठी ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-एसजी-टी-03-2026-27 दिनांक 22.05.2026, कामाची अंदाजित किंमत:** रु. 15.29/- लाख (जीएसटी वगळून), **ईएमडी रक्कम:** रु. 30,600/-, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 05.06.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या: www.ireps.gov.in

दिनांक : २३ मे २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - पिंपळपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) मालती मधुकर देशमुख<br>२) सुजाता सुनिल चौधरी<br>३) निशा पंडित घारे<br>४) अनिता अनिल सरखोत<br>५) सारीका समीर गंभिरराव<br>६) प्रशांत मधुकर देशमुख<br>७) प्रफुल मधुकर देशमुख | १८ | २/ब | ०-२०-२० | २ | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २३/०५/२०२६

### जाहीर निविदा
### ग्रुप ग्रामपंचायत पाणसई, ता.माणगाव जि.रायगड
**१५ वा वित्त आयोग अंतर्गत विकास कामांची व साहित्याची निविदा खालीलप्रमाणे** दि.२२/०५/२०२६

| अ क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम सादर करणेचा दिनांक | ग्रा.प. कडे निविदा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | कचरा संकलनासाठी व्यवस्था करणे | ५२०६८/- | २००/- | ५२०/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| २) | पाणसई नदीतील गाळ काढणे | ६१८२०/- | २००/- | ६१८/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| ३) | भिनाड येथे गणेश वाघरे यांचे घरापासून टाकीकडे भूमीगत गटार व रस्ता करणे | ६५६७२/- | २००/- | ६५६/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| ४) | पाणसई आदिवासीवाडी पाणी योजना दुरूस्त करणे | ७५९०८/- | २००/- | ७५९/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| ५) | पाणसई आदिवासीवाडी येथे पाण्याचे डोहाचे बांधकाम करणे | ५००००/- | २००/- | ५००/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| ६) | पाणसई तलावातील गाळ काढणे | ६९५८७/- | २००/- | ६९५/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| ७) | भिनाड विहीर दुरूस्त करणे | ६००००/- | २००/- | ६००/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| ८) | करंजेवाडी येथे पिण्याच्या पाण्याचा आड दुरूस्त करणे | ७९१७४/- | २००/- | ७९१/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| ९) | सिद्धार्थनगर गटार व रस्ता करणे | ६१८२०/- | २००/- | ६१८/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |
| १०) | सर्व गावांना स्ट्रेचर पुरविणे | ८२३६३/- | २००/- | ८२३/- | दि.०१/०६/२०२६ सायं ०५.०० वा. | दि २/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती :-**

१) सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत पाणसई येथे कार्यालयीन वेळेत मिळेल
२) निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा प्रशासक तथा ग्रामपंचायत पाणसई यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३) उपलब्ध निधीनुसार देयक आदा करणेत येईल
४) निविदा प्रशासक तथा ग्रामपंचायत पाणसई ता. माणगाव जि.रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात
५) देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६) अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही
७) ठेकेदारांनी वर्क ऑर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**

**सही/-**
**सरपंच/प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**

दी भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
मध्यवर्ती कार्यालय : मारूतागिरी, प्लॉट क्र. १३/९ए, सोनावाला रोड,
गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३.
दूर. : ६१८९००८८/ ६१८९ ०१३४/६१८९००८३

### ताबा सूचना

ज्याअर्थी,

अधोहस्ताक्षरीत दी भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अनुसार व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३ (१२) सहवाचन नियम ३ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये **मुख्य कर्जदार : श्री. बालाजी शहाजी गगनमाळे** यांना सूचनेत निर्देशित रक्कम दि. २५.०६.२०२५ रोजीनुसार रु. ३९,५४,९७८.०० (रु. एकोणचाळीस लाख चोपन्न हजार नऊशे अठ्ठ्याहत्तर मात्र) चे प्रदान करण्याकरिता स्वीकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्याकरिता मागणी सूचना दि. २६.०६.२०२६ जारी केली होती.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदारांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड अलिबाग यांच्याद्वारे क्रिमी. एमए नं. ९२/२०२६ द्वारे मंजूर आदेश दि. १२.०३.२०२६ च्या अंमलबजावणीअंतर्गत कोर्ट रिसीव्हरच्या माध्यमातून सदर कायद्याचे अनुच्छेद १३ (४) अंतर्गत व सदर नियमाच्या अनुच्छेद १३ (४) सहवाचन नियम ९ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तांचा दि. २१ मे, २०२६ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदारांना व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे दी भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. च्या प्रभारांतर्गत दि. २५.०६.२०२५ रोजीनुसार रु. ३९,५४,९७८.०० (रु. एकोणचाळीस लाख चोपन्न हजार नऊशे अठ्ठ्याहत्तर मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज रकमेच्या अधीन असेल.

**मालमत्तेचे विवरण**

फ्लॅट क्र. ३०३, मोजमापित ३७८ चौ. फूट चटई क्षेत्रफळ अर्थात ३५.१२ चौ. मी. चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला, ए विंग, इमारतीचे नाव सिंहगड - सिंहगड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. मधील, १२.५% जीईएस जमिनीवर निर्मित, प्लॉट क्र. ३ए, सेक्टर ७, गाव कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, नोंदणीकरण उपजिल्हा पनवेल व जिल्हा रायगड, कामोठे, नवी मुंबई - ४१० २०९ येथील, **श्री. बालाजी शहाजी गगनमळे** यांच्या मालकीची व सीमा पुढीलप्रमाणे :

पूर्वेस : गंगाधर कॉम्प्लेक्स, उत्तरेस - स्वस्तिक मीना सीएचएसएल,
पश्चिमेस : साई प्रसाद सीएचएसएल, दक्षिणेस : रस्ता.

तारीख : २१.०५.२०२६
ठिकाण : कामोठे, रायगड

सही/-
**प्राधिकृत अधिकारी**

### जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक श्री. कार्तिकेय अक्षयपत सिंघानिया व श्री. शाश्वत अक्षयपत सिंघानिया यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क /अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड. | ४०२ | ०-५७-१० पैकी ०-४७-१० | १.०० |

अलिबाग,
दिनांक २३/०५/२०२६

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट
कृष्णवंदन-२,ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड,
मो.-९८२२५२८९३१
ईमेल -adv.rdpatil@gmail.com

# जेएनपीएत 25000 कंटेनर अडकून

- बंदरातील वाहतूक व्यवस्था कोलमडली
- वाहनचालकांना परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू

। चिरनेर । प्रतिनिधी ।

नुकत्याच झालेल्या पाच राज्यातील निवडणुक आणि मे महिन्याच्या सुट्टीवर गेलेल्या सुमारे साडेचार हजार टीटी वाहनचालक परतलेच नसल्याने जेएनपीएची कंटेनर वाहतूक व्यवस्था पुरती कोलमडली आहे. बंदरात अडकून पडलेल्या सुमारे २५००० कंटेनर आयात निर्यात कंटेनरची वेळेत हाताळणी, वाहतूक करण्यासाठी आता जेएनपीएने परराज्यात गेलेल्या टीटी वाहनचालकांना बंदरात आणण्यासाठी रेल्वे गाड्या बुकिंग करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्यासाठी ५० लाखांहून अधिक खर्चाची तरतूदही करण्यात




आली असल्याची माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली आहे.

मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती निवळताच जेएनपीएचे कंटेनर हाताळणीचे काम हळूहळू पुर्व पदावर येण्यास सुरुवात झाली होती. मात्र, याच दरम्यान पार पडलेल्या पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, केरळ, आसाम, पाँडीचेरी राज्याच्या निवडणुकीसाठी जेएनपीए बंदर व बंदर परिसरातील शेकडो विविध कंटेनर फ्रेट स्टेशनमध्ये (सीएफएस) काम करणारे सुमारे साडेचार हजार टीटी वाहनचालक सुट्टीवर गेले आहेत. तर, हजारो टीटी वाहनचालक हे महिन्यांची सुट्टी कुटुंबियांच्या सोबत व्यतीत करण्यासाठी आपापल्या राज्यातील गावाकडे गेले आहेत. मात्र, दोन महिन्यांपासून परगावी गेलेले टीटी वाहनचालक परतलेच नाहीत. त्यामुळे जेएनपीए बंदरातील होणारी आयात निर्यात होणारी कंटेनरची वाहतूक पुरती कोलमडली आहे. हजारो कंटेनर बंदराबाहेरील सीएफएसपर्यंत पोहचविण्यासाठी व सीएफएसमधुन बंदरात आणण्यात मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून सुमारे २५००० हजार कंटेनर जेएनपीए बंदरात आणि परिसरातील विविध सीएफएसमध्ये अडकून पडले आहेत.

जेएनपीए बंदरातील उद्‌भवलेल्या कंटेनर वाहतूकीच्या समस्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी कंटेनर फ्रेट स्टेशन असोसिएशन ऑफ इंडिया व बृहन्मुंबई कस्टम ब्रोकर्स असोसिएशनने जेएनपीएकडे केली होती. मात्र, जेएनपीएने टीटी वाहनचालकांची व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधित असोसिएशनचीच असल्याचे सांगत जेएनपीएने हात झटकले होते. मात्र, बंदरातील आणि सीएफएस दरम्यान कंटेनर वाहतूक अडचणीत आली आहे. त्यानंतर जेएनपीएनेच परराज्यात गेलेल्या टीटी वाहनचालकांना आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

> भारत मुंबई कंटेनर टर्मिनल्समुळे जेएनपीए बंदराची वार्षिक कंटेनर हाताळणीची क्षमता ५० लाखांवरुन १ कोटी २ लाखांपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे बंदरावर कंटेनर वाहतूकीचा ताण वाढला आहे. त्यामध्ये नव्याने टीटी वाहनचालकांच्या तुटवड्याची भर पडली आहे. त्यामुळे बंदरात मागील काही दिवसांपासून जवळपास सुमारे २५००० कंटेनर अडकून पडले आहेत. परराज्यातुन टीटी वाहनचालकांना परत बंदरात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. काही टीटी वाहनचालकांना रेल्वेची बुकिंग करून पश्चिम बंगालमधून माघारी आणण्यात आले आहेत. उर्वरित वाहनचालकांना रेल्वेने आणण्यासाठी जेएनपीएने ५० लाखांहून अधिक निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे येत्या आठवडाभरात बंदरात अडकून पडलेल्या कंटेनरचा प्रश्न निकाली निघेल.
> – गिरीश थॉमस, वरिष्ठ अधिकारी, जेएनपीए कंटेनर वाहतूक विभाग

# पर्यटकांसह नागरिकांनीही काळजी घ्यावी

## आयुक्त रुबल अग्रवाल यांचे आवाहन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

नागाव समुद्रकिनारी रोबाटीक बोयोची कार्यपद्धत प्रत्यक्ष अनुभवली. काशीद समुद्रात बूडणाऱ्या पर्यटकाला बोयाच्या मदतीने वाचविण्यात आले आहे. बोयोच्या कार्यपद्धतीविषयी प्रत्यक्ष जाणून घेतल्यानंतर समाधान व्यक्त करीत कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी सांगितले की, या भागात पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. पर्यटक व आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन तत्पर तसेच सज्ज आहे. मात्र, पर्यटक आणि नागरिकांनीदेखील स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन केले.

रोबोटिक बोयो या जीवरक्षक यंत्राचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल या शुक्रवारी (दि.२२) नागाव येथील समुद्रकिनारी आल्या होत्या. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, सामान्य प्रशासन विभागाचे



उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके, तहसीलदार विक्रम पाटील, गटविकास अधिकारी शर्मिला पाटील, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, ग्रामपंचायत अधिकारी श्वेता कदम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, उपसरपंच मंगला नागे, सदस्य प्रियंका काठे, निकीता पाडेकर, विना पिंपळे, रोहीणी घरत, मंडळ अधिकारी सखाराम आगे, ग्राम महसूल अधिकारी राम घुमरे, ममतेश पाटील, सतिश ठाकूर, विनेश नागवेकर, दिपक शहाबाजकर, स्वप्नील कवाड, सोनाली राणे, प्रणाली दळवी, रश्मी वाडकर, कल्पेश नाईक, मंदार म्हात्रे, रमेश कवळे, प्रशांत कीर, रोबोटिक बोयो चालक मनीष म्हात्रे व मानकर आदी उपस्थित होते.


यावेळी कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल म्हणाल्या की, मान्सून पुर्व तयारी केली जात आहे. याबाबत विभागस्तरासह जिल्हास्तरावर वेगवेगळ्या बैठका घेण्यात आल्या आहेत. कोकण विभागात रायगड सर्वात संवेदनशील जिल्हा आहे. जिल्ह्यात मान्सूनचा प्रभाव राहतो. काशिदमध्ये बोयाच्या माध्यमातून पर्यटकांना वाचविण्याचे काम केल्याची माहिती मिळाली. त्यामुळे नागावमधील रोबोटीकचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी आले. रोबोटिक बोयो खऱ्या अर्थाने जीव रक्षक म्हणून ठरल्याचे कौतूक अग्रवाल यांनी केले.

## निवडक



### ‘प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावा’

**उरण :** नवी मुंबई शहराच्या उभारणीसाठी आपल्या जमिनींचा त्याग करणाऱ्या ठाणे, उरण आणि पनवेल तालुक्यातील ९५ गावांतील प्रकल्पग्रस्तांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले जिव्हाळ्याचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी बेलापूर येथील सिडको भवन येथे एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्तांच्या शिष्टमंडळाने सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर मागण्यांचे निवेदन सादर केले. या बैठकीत खासदार सुरेश म्हात्रे यांनी प्रकल्पग्रस्तांच्या विविध न्याय्य मागण्यांवर आक्रमकपणे बाजू मांडली. यावर सकारात्मक प्रतिसाद देत सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सह-व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांना प्रकल्पग्रस्तांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांवर तातडीने एक विशेष बैठक आयोजित करून हे प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचे निर्देश दिले आहेत. या बैठकीला आगरी कोळी यूथ फाउंडेशनचे अध्यक्ष निलेश पाटील, शेकाप खजिनदार अतुल म्हात्रे, कामगार नेते भूषण पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील, संतोष पवार, ॲड. रोशन पाटील, सिडको युनियन अध्यक्ष संजय पाटील, मयूर तांडेल, अविनाश सुतार, संजय पाटील, हिमांशु पाटील, रवी मढवी, संतोष घरत, राज पाटील आदींसह इतर प्रमुख प्रकल्पग्रस्त व पदाधिकारी उपस्थित होते.




### क्रिकेट थीम हटविण्याची मागणी

**पनवेल :** नवीन पनवेल येथील आदई सर्कलला आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे नाव देण्यात आलेले आहे. असे असतानाही त्या ठिकाणी महानगरपालिकेकडून क्रिकेट थीम उभारण्यात आल्याने स्थानिक नागरिक व क्रांतिवीरप्रेमींतून नाराजी व्यक्त होत आहे. ही क्रिकेट थीम येत्या १५ दिवसांमध्ये हटवून त्या ठिकाणी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे स्मारक उभारण्यात यावे. अन्यथा पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे एक लाक्षणिक उपोषण आदई सर्कल येथे करण्यात येणार असल्याची माहिती असोसिएशनचे संस्थापक केवल महाडिक यांनी दिली आहे. याबाबतचे पत्र त्यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांना दिले आहे.

### झुगरेवाडी शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

**नेरळ :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा झुगरेवाडी ही आदिवासी भागातील उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते. या शाळेतील विद्यार्थ्यांनी वेळोवेळी आपली गुणवत्ता सिद्ध केली असून, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळा व गावाचा नावलौकिक वाढवला आहे. झुगरेवाडी जिल्हा परिषद शाळेचे शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे हे फळ असून विद्यार्थ्यांनी परीक्षा परिषदेचे सराव पेपर सोडवून सातत्यपूर्ण सराव केला. त्यात अनु पारधी व तृया पारधी या दोन विद्यार्थिनी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्या आहेत. मुख्याध्यापक रवी काजळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजश्री पाटील, जनार्दन निरगुडा, लक्ष्मण पादिर यांनी जादा सराव तासाचे नियोजन करून विद्यार्थ्यांकडून चाळीस सराव पेपर सोडवून घेतले. त्यामुळे विद्यार्थ्यांना यश मिळविता आले. या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष वसंत पारधी, सदस्य सुनील सावळा व सर्व शिक्षकांचे ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.




# कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे हैराण

- ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत
- महावितरणकडे निवेदनाद्वारे उपाययोजना करण्याची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील खांडपे गावात गेल्या वर्षभरापासून सुरू असलेल्या कमी दाबाच्या वीज पुरवठा होत आहे. वीज पुरवठ्यामुळे ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या गंभीर समस्येबाबत ग्रामस्थांनी महावितरण कंपनीकडे लेखी निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



खांडपे गावात कमी दाबाच्या वीज पुरवठ्याचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत आहे. रात्री अपुऱ्या प्रकाशामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून, पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. तसेच, ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेच्या मोटारीही व्यवस्थित सुरू होत नसल्याने गावात पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावातील वीज वाहक तारा जुने जुन्या झाल्या आहेत. खांडपे गावात सध्या फक्त १६० ते १८० व्होल्ट इतकाच वीज दाब मिळत असल्याने घरातील बल्ब, पंखे, फ्रीज तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे व्यवस्थित चालत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. अनेक उपकरणे बंद पडण्याच्या स्थितीत असून आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. याबाबत महावितरणकडे वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त करत महावितरण विभागाने तातडीने दखल घेऊन आवश्यक दुरुस्ती व सुधारणा कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# नगरसेवकांनी घेतले झाडांचे पालकत्व



। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहराच्या निर्मितीच्या १७६ व्या स्थापना दिनाच्या निमित्ताने शहरात आगळीवेगळी संकल्पना राबविण्यात आली. नगरपरिषदेत असलेले २० नगरसेवक नगरसेविका, दोन स्वीकृत नगरसेवक आणि थेट नगराध्यक्ष यांनी प्रत्येकी एक वृक्ष लागवड करून त्यांचे पालकत्व स्वीकारले. शहरातील महात्मा गांधी रस्त्यावर मुख्य बाजारपेठ भागात ही पालकत्व योजना राबविण्यात आली.

ब्रिटिशांनी २१ मे १८५० मध्ये माथेरानचा शोध लावला. ब्रिटिश देश सोडून गेले पण आजही माथेरान मधील ब्रिटिश राजवटीच्या खाणाखुणा कायम आहेत. ब्रिटिशांच्या काळात शोध लावण्यात आलेले माथेरान हे शहर आजही आपल्या शहराचा स्थापना दिवस साजरा करीत आहे. माथेरान नगरपरिषदेच्यावतीने माथेरान शहराचा वाढदिवस साजरा करीत असताना अनेक नवीन संकल्पना आणि उपक्रम राबविण्यात भर देत आहे. माथेरान मधील वनराई टिकवून ठेवण्यासाठी आणि हिरवेगार माथेरान हा वारसा जपण्यासाठी झाड पालकत्व ही संकल्पना राबविण्यात आली. माथेरान नगरपरिषदेत थेट नगराध्यक्ष आणि दोन स्वीकृत नगरसेवक तसेच निवडून आलेले २० नगरसेवक अशा २३ लोकप्रतिनिधी यांनी वृक्ष पालकत्व संकल्पना राबविली. शहराच्या मुख्य रस्त्यातील मुख्य बाजारपेठ असलेल्या महात्मा गांधी रस्त्यावर प्रत्येक लोकप्रतिनिधींकडून एक झाड लावण्यात आले. नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, उपनगराध्यक्ष संतोष शेलार यांच्यासह विरोधी पक्षाचे नेते सीताराम कुंभार, गटनेते शिवाजी शिंदे, माजी नगराध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेवक मनोज खेडकर, स्वीकृत नगरसेवक प्रवीण सकपाळ, लोकप्रतिनिधी सुनील शिंदे, गौरंग वाघेला, रिझवान शेख, ऐश्वर्या तोरणे, सुरेखा साळुंखे, लता ढेबे, कमल गायकवाड, अनुसया ढेबे, अनिता रांजणे, अर्चना भिलारे, प्रियंका कदम, प्रतिभा घावरे, किरण पेमारे, सोहेल महापुले, किशोर मोरे यांच्या हस्ते ही झाडे लावण्यात आली.

# कर्जत पोलीस मित्र संघटनेचे उपोषण

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील तहसील कार्यालयातील सर्वर डाऊन असल्याने वेब साईट चालत नाहीत. त्यामुळे विद्यार्थी आणि नागरिकांना वेळेत सर्व प्रकारचे दाखले मिळत नसलेल्या गंभीर समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पोलीस मित्र संघटनेने शुक्रवार दि.२२ मेपासून कर्जत प्रशासकीय भवन येथे उपोषण सुरू केले आहे.

पोलीस मित्र संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष रमेश कदम यांनी शुक्रवारपासून कर्जत प्रशासकीय भवन बाहेर उपोषणाल सुरुवात केली आहे. सरकारी सर्वर डाऊन असल्याने सातत्याने कामे खोळंबून



राहतात. त्यात तालुक्यातील हजारो विद्यार्थी आणि नागरीकांना वेब साईट चालत नसल्यामुळे सर्व प्रकारचे दाखले वेळेत मिळत नाहीत. त्यामुळे शासनाने व प्रशासनाने सर्व प्रकारचे दाखले ऑफलाईन देण्याची व्येवस्था करावी. तसेच, उत्पन्न दाखले दाखल केल्याल्या पावतीवर सर्व विद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्या पूर्ण न केल्यास बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्ते रमेश कदम यांनी प्रशासनाला दिला आहे.

# बियरच्या बाटलीने केली मारहाण

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

यापूर्वीच्या घटनेचा राग मनात धरून तरुणाच्या डोक्यात बियरची बाटली मारून इतर मित्रांनी लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचा प्रकार कामोठ्यात घडला. याप्रकरणी रोशन सुर्वे आणि इतर सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. रोहित कोळेकर हा जेवणाचे पार्सल घेऊन हॉटेलमधून बाहेर पडला. त्यावेळी रोशन सुर्वे यांनी रोहितच्या डोक्यात बियरची बाटली मारली आणि त्याच्यासोबत असलेल्या सात जणांनी रोहितला शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.

# हाय सिक्युरीटी नंबर प्लेट बसविण्याकरिता मुदतवाढ

। पनवेल । प्रतिनिधी ।

परिवहन विभागामार्फत वाहनांना हाय सिक्युरीटी नंबरप्लेट बसविण्याकरिता मुंबई परिवहन आयुक्त कार्यालयाच्या परिपत्रकानुसार दि.३० जून पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याची सर्व वाहनधारकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन पनवेलचे सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी निलेश धोटे यांनी केले आहे. वाहनांना हाय सिक्युरीटी नंबर प्लेट बसविणे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी करण्यासाठी वाहनांची ओळख पटवणे, नंबरप्लेट मध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. या निर्देशांची अंमलबजावणी व नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादीत झालेल्या सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना हाय सिक्युरीटी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या कामासाठी परिवहन विभागाने अधिकृत कंपन्याची नेमणूक केली असून, त्यांच्यामार्फतच हाय सिक्युरीटी नंबर प्लेट लावणे बंधनकारक आहे. इतर अनधिकृत विक्रेत्यांकडून नंबरप्लेटची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेसमध्ये नोंद होणार नाही.

# ‘संपत्ती स्थानिकांची, चांदी अधिकाऱ्यांची’

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहरातील पर्डी क्रमांक ७४ ‘अ’ या ४.२२ गुंठे जमिन मालकाचे नाव सातबाऱ्यावर चढविण्यासाठी तब्बल १ लाख रूपयांची लाच मागणारा अधिकारी गजाआड झाला. पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांच्या तक्रारीमुळे मंडल अधिकारी गोवर्धन माने ३० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडला. परंतु, केवळ महसूल विभागात हा भ्रष्टाचार नाही, तर पनवेल तालुक्यातील सर्वच शासकीय यंत्रणा भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. पनवेल तालुक्यातील बापजाद्यांच्या कमाईतून मिळवलेल्या जमिनीवर सरकारी अधिकाऱ्यांचा डोळा असून, शेकडो अधिकाऱ्यांनी



सोन्याच्या तुंबड्या भरल्या आहेत. काम फुकट करण्याची जबाबदारी असलेले अधिकारी प्रत्येक काम पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत, असा आरोप निलेश पाटील यांनी शुक्रवारी (दि.२२) घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला. तसेच, आमच्या हक्काच्या कामासाठी पैसे का द्यायचे, असा प्रश्न विचारल्याशिवाय गोरगरीब शेतकऱ्यांची कामे होणार नाहीत. पैशासाठी कोणाचे काम अडविले जाणार असेल तर माझ्याशी संपर्क साधा. मी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करेन, असे आवाहन निलेश पाटील यांनी केले.

# पनवेलकरांना दिवसाआड पाणी

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहराला पाणीपुरवठा देहरंग धरणातून जलवाहिनीद्वारे करण्यात येतो. पनवेल शहराला सुमारे २७एमएलडी पाण्याची गरज असून, एकूण १५ एमएलडी पाणी बाहेरून प्राप्त होत आहे. परंतु, देहरंग धरणातील पाणी साठी कमी होत असल्याने पाणीटंचाईवर मात करण्यातरीता आतापर्यंत उत्तम नियोजन केले आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत कळविण्यात आले आहे की, २५ मे पासून आठवड्यातून एक दिवस संबंधित भागातील पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

## आंब्यासह जांभुळ, करवंदांना मोठी मागणी | विक्रीतून ग्रामीण महिलांना हक्काचा रोजगार

# उन्हाळी रानमेव्याची खवय्यांना मेजवानी

सलीम शेख
। माणगाव ।

उन्हाळा म्हणजे रान फळांची मेजवानी घेऊन येणारा ऋतू असतो. इतर कोणत्याच ऋतूत न मिळणारी फळे, फुले खास या ऋतूत मिळतात. त्यामध्ये जांभळं, करवंदं, आठुरणी, कोकम इत्यादी फळांचा समावेश असतो. उन्हाळी दिवसांत तयार होणारी ही फळे म्हणजे खवय्यांसाठी चविष्ट असा गोडवाच असतो. तसेच, ग्रामीण भागातील महिलांना देखील हक्काचा रोजगार उपलब्ध होतो.

उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यानंतर आंबा, काजू इत्यादी फळांवरोबर सर्वसामान्यांच्या



आवडीची असलेली खास गोडव्याची फळे म्हणजे जांभळे आणि करवंदे होत. रानाची मैना म्हणून करवंदांच्या उल्लेख केला जातो. कोकणातील डोंगर रांगात दिसणाऱ्या लहान-मोठ्या विस्तीर्ण अशा करवंदाच्या जाळी विविध पशुपक्ष्यांसाठी निवारा तर असतोच त्याबरोबरीने उन्हाळी दिवसात हिरव्या पानातून डोकावणारी काळाकभिन्न करवंदांची फळे सर्वांनाच आवडतात. आंबट-गोड चवीला लागणारी ही करवंदांची फळे म्हणजे खास उन्हाळ्यातील रानमेवा म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यापासून सुगरणी चविष्ट चटणी व लोणची तयार करतात.

करवंदांप्रमाणे डोंगर भागात जांभळीची झाडे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. उन्हाळी दिवसात तयार होणारे तुरट गोड चवीची फळे खायला चविष्ट असतात. जांभळाचे आयुर्वेदात असंख्य उपयोग सांगितले आहेत. जांभळे मधुमेहींसाठी खास औषधी म्हणून आहेत. हाडकी, मांसवाली, मनुकांच्या आकाराची तर काही टपोरी असणारी जांभळे खवय्यांसाठी पर्वणी असते. तसेच, लालचुटुक रंगांनी मन वेधून घेणारी कोकमाची फळे ही या ऋतूमध्ये तयार होतात. आमसूल, सरबत तयार करण्यासाठी उपयुक्त असलेली ही फळे गृहिणींच्या खास आवडीचे असतात. आयुर्वेदातही या फळांचे अनेक उपयोग, गुणधर्म सांगितले आहेत. तसेच, आठूरणी, मंदुकली इत्यादी लहान-मोठी फळे खवय्यांसाठी पर्वणी असते. या रामेव्याव्याच्या विक्रीतून ग्रामीण भागातील अनेक महिलांना हक्काचा रोजगार मिळतो.

### आरोग्यदायी रानमेवा

उन्हाळ्यातील रान मेव्याचा हा गोडवा खवय्यांच्या पसंतीचा असून, याची चव वर्षभर मनात रेंगाळत राहते.खास करून कोकणात वैशिष्ठ्य पूर्ण असलेली ही रानफळे आहारात उपयुक्त असून, आरोग्यासाठी देखील उपयुक्त आहेत. उन्हाळा ऋतू संपत असताना पुढील काही दिवसांत रानमेव्याचा आनंद भरभरून घेतला जाईल. रान फळांचा हा हंगाम खास वटपौर्णिमेपर्यंत सुरू राहतो. वटपौर्णिमेच्या निमीत्तानेही रान मेव्याला चांगली मागणी असते. सुवासिनी आवर्जून या रान फळांनी वाण सजवितात. तसेच, रानफळांच्या विक्रीतून ग्रामीण भागातील महिलांना हक्काचा रोजगार मिळतो.

## ‘झुरळां’चा उद्रेक

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणीदरम्यान देशातील बेरोजगारांचा उल्लेख झुरळे असा केला. आपल्या बोलण्याचा विपर्यास केला गेला असा खुलासा नंतर त्यांनी केला. मिडियाने चुकीच्या रीतीने त्याच्या बातम्या केल्या असा त्यांचा दावा आहे. हा शेरा तोंडी मारलेला होता. लेखी निकालपत्रात वगैरे लिहिलेला नव्हता. तरीही भर न्यायालयात असंख्य लोकांच्या समोर उच्चारलेला होता. शिवाय देशातील प्रतिष्ठित वृत्तसंस्था आणि वृत्तपत्रांचे पत्रकार तिथे हजर बहुधा हजर होते. त्या सगळ्यांनी गफलत केली असण्याची शक्यता कितपत आहे हा चर्चेचा मुद्दा आहे. पत्रकारिता, सामाजिक कामे किंवा वकिली यामध्ये अर्ध्याकच्च्या ज्ञानानिशी आलेले, किंवा भलत्याच हेतूने त्यात उतरलेले अनेक जण असतात हे खरे आहे. आपण अशा लोकांविषयी बोलत होतो असे सरन्यायाधीशांचे म्हणणे आहे. ते खरेच मानायला हवे. मात्र त्यांच्या तोंडून झुरळ असा शब्द गेला व बातम्यांमधून त्याला वेगळे संदर्भ जोडले गेले ही सत्य बाब आहे. याची जोरदार प्रतिक्रिया देशभर उमटली असून आता एका जबरदस्त बंडखोर रुपात ती प्रकट झाली आहे. कॉक्रोच जनता पार्टी किंवा झुरळ जनता पक्ष नावाने एक पक्ष स्थापन केला जात असल्याचे इन्स्टाग्रामवर जाहीर झाले आणि दोन दिवसात त्याला दोन कोटी फॉलोअर्स मिळाले. सध्या कोणत्याही गोष्टीच्या यशाचे मोजमाप करण्याचे प्रमुख साधन म्हणजे एखाद्या गोष्टीला सोशल मिडियामध्ये किती वेळात किती फॉलोअर्स किंवा लाईक्स वगैरे मिळाले हे असते. या नव्या पक्षाला स्थापन झाल्यापासून अवघ्या ४८ तासात कोट्यवधी लोकांनी मान्यता दिल्याने सनसनाटी निर्माण झाली. सध्या तरी हे बंड केवळ सोशल मिडियामध्ये आहे. या उद्रेकाचा वणवा जमिनीवर पसरणार का आणि आपल्या देशातील संसदीय लोकशाहीला तो कवेत घेणार का या खूप लांबच्या गोष्टी आहेत. पण हा वणवा भडकला आहे हे वास्तव आहे. लोकांच्या मनात बातम्यांमध्ये आलेल्या उद्गारांवरून प्रचंड संताप उसळला हे वास्तव आहे. त्याविरोधात आपण आवाज उठवायला हवा असे अनेकांना वाटले हे वास्तव आहे. यामध्ये बहुसंख्येने तरुण आहेत हेही वास्तव आहे.

### मोदी सरकार घाबरले

सध्याच्या मोदी सरकारला याची भीती वाटली आणि त्यांनी तात्काळ या पक्षाची कोंडी करण्याचे प्रयत्न केले. इन्स्टाग्रामने या पक्षाचे खाते काही काळ बंद केले. हे असे का केले याला कोणतेही सयुक्तिक कारण नाही. कारण, या पक्षाचा संस्थापक अभिजित दीपके याने विविध वृत्तपत्रे व वाहिन्यांना ज्या मुलाखती दिल्या त्यात त्याने आपण गांधी व आंबेडकरांच्या मार्गाने जाणार असल्याचे म्हटले होते. उद्या हा पक्ष प्रत्यक्षात उभा राहून काम करू लागलाच तर त्यात हिंसेला अजिबात थारा नसेल असेही त्याने वारंवार स्पष्ट केले आहे. त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेला धोका होईल असे कोणतेही वक्तव्य किंवा लिखाण त्याने केलेले नाही. देशाविरुध्द कोणतीही चिथावणी त्याने दिलेली नाही. सध्याचे तरुण सोशल मिडियावर पडीक असतात, आळशी असतात, दुसऱ्यांच्या जिवावर जगणाऱ्या परजीवींप्रमाणे वागतात असा अभिप्राय सरन्यायाधीशांनी नोंदवलेला होता. त्यामुळे अशा प्रकारचे जे कोणी बेरोजगार असतील त्यांनीच या पक्षाचे सदस्यत्व घ्यावे असे उपरोधिक आवाहन दीपके यांनी केले होते. यातही हिंसक किंवा देशविरोधी काहीही नव्हते. त्यामुळे इन्स्टाने त्यांचे पेज उडवण्यामागे सरकारचा दबाव हेच एकमेव कारण असावे. सोशल मिडियात या झुरळ जनता पक्षाची लोकप्रियता इतकी वाढली की त्याने दोनच दिवसात भाजपला फॉलोअर्सच्या संख्येत मागे टाकले. यामुळे भाजपच्या नेत्यांना बहुधा पोटशूळ निर्माण झाला असावा. शिवाय सत्तेच्या विरोधात उभे राहू शकणारे हे संभाव्य बंड वेळीच खुडून टाकायला हवे असाही विचार त्यांनी केला असावा. पण प्रत्यक्ष जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांमार्फत अडवता येते, इडीच्या धाडी घालून घाबरवता येते, मारझोड करून दहशत निर्माण करता येते. पण सोशल मिडियातल्या अशा बंडाला चिरडणे सध्या सोपे नाही. एक खाते बंद झाले तर अशी हजारो खाती निर्माण होऊ शकतात. आखाती तसेच आफ्रिकी देशांमध्ये किंवा अलिकडे बांगलादेश, श्रीलंका व नेपाळमध्ये ज्या क्रांत्या झाल्या त्यावेळीही सोशल मिडियाचा असाच वापर झाला होता.

### अस्वस्थतेचा स्फोट

सोशल मिडियातील लोकप्रियता जितक्या झपाट्याने वाढते तितक्याच वेगाने ती कमीही होऊ शकते. राजकीय पक्ष किंवा संघटना ही सोशल मिडियातून चालवता येत नाही. त्यासाठी लोकांचे प्रश्न प्रत्यक्ष सोडवावे लागतात. त्यासाठी आंदोलने करावी लागतात. संघटना उभी करावी लागते. कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करून त्यांचे प्रशिक्षण करावे लागते. शिवाय हे सगळे केले तरी संसदीय निवडणुका जिंकणे हे वेगळेच तंत्र असते. संघटना उभारणे व प्रचंड संख्येने लोक जमा करणे हे आजवर शरद जोशींपासून ते सध्याच्या पंजाबातील शेतकरी संघटनांपर्यंत अनेकांनी केले. गुजरातेतील पटेलांच्या राखीव जागांच्या आंदोलनाला किंवा महाराष्ट्रात मनोज जरांगे यांच्या उपोषण वगैरे कार्यक्रमांना लोकांचा जबरदस्त पाठिंबा मिळाला. पण त्यातून राजकीय पक्ष निर्माण होऊ शकले नाहीत. निवडणुकीमध्ये या जनमताचा विरोधी पक्षांना फायदा झाल्याचे दिसले नाही. उलट ही गर्दी बहुतांश करून भाजपच्याच मागे गेल्याचे दिसले. दीपके हे शाळेत असताना आम आदमी पक्षाचा झेंडा घेऊन फिरत असत असे त्यांच्या वडिलांनी सांगितले आहे. सध्या ते अमेरिकेत विद्यार्थी म्हणून गेले आहेत व तिथूनच त्यांनी हा पक्ष स्थापन केला आहे. अरविंद केजरीवाल यांच्या आपलाही सुरुवातीच्या काळात परदेशातील तरुणांनीच आर्थिक व इतर मदत केली होती. त्यामुळे जयप्रकाश आंदोलनानंतर तरुणांचा नवा झंझावात निर्माण होईल असे अनेकांना वाटू लागले. पण नंतर आम आदमी पक्षाला आपले स्वत्व टिकवता आले नाही. केजरीवाल यांच्याभोवतीच पक्ष फिरू लागला. त्यातच त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. शिवाय त्यांच्यातले अनेक जण भाजपच्याच विचारांचे असल्याचे आरोप पूर्वापार होत होतेच. झुरळ जनता पक्ष हादेखील भाजपचेच एक पिल्लू आहे की काय अशी शंका व्यक्त केली जात आहे. तोदेखील आम आदमी पक्षाच्या वाटेने जाईल अशीही भीती अनेकांनी नोंदवली आहे. पण या सर्व पुढच्या गोष्टी आहेत. मुळात हा एक राजकीय पक्ष म्हणून अस्तित्वात येईल का आणि त्याची ध्येयधोरणे काय असतील हे नक्की नाही. तिची नेतेमंडळी व कार्यकर्ते कोण असतील हेही अस्पष्ट आहे. त्यामुळे त्याविषयी फार खल करण्यात आणि अंदाज बांधण्यात अर्थ नाही. पण या निमित्ताने भारताच्या तरुणांमध्ये सध्याचे सरकार, न्यायालयांसकटची सध्याची व्यवस्था याबाबत जो एक संताप व निराशा आहे तिचा एक छोटा का होईना स्फोट झाला आहे. त्याची दखल सर्वांनाच घ्यावी लागणार आहे. विशेषतः मोदींना विरोध करणाऱ्या विरोधकानी तिच्याकडे नकारात्मक दृष्टीने पाहता कामा नये. उलट या अस्वस्थतेचा कसा उपयोग करता येईल व या तरुणांना आपल्याकडे कसे आणता याचा त्यांनी गंभीरपणे विचार करायला हवा.

---

विचार

# ऊर्जा सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्याचे आव्हान

***अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या दरांमध्ये मोठी वाढ झाली. अनेक देशांमध्ये पेट्रोल डिझेलचा तुटवडा निर्माण झाला. असे असताना सरकारने पेट्रोल आणि डिझेलचे दर स्थिर ठेवले. मात्र वाढलेल्या दरांचा भार शोषून घेताना तेल विपणन कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागला. त्यामुळे यापुढे ऊर्जा सुरक्षेसोबतच आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवणे हे सरकार आणि तेल कंपन्यांसमोरचे मोठे आव्हान ठरणार आहे.***



महेश धर्माधिकारी

अमेरिका आणि इराण यांच्यादरम्यान चाललेल्या संघर्षाचा तेलपुरवठ्यावर मोठा परिणाम झालेला पहायला मिळाला. जगभरातील अनेक देशांमध्ये तेलटंचाई निर्माण झाली आणि पेट्रोल-डिझेलच्या दरांमध्येही मोठी वाढ झाली.पण जगातील सर्वात मोठ्या तेल आयातदार देशांपैकी एक असूनही आणि भारताच्या जवळपास ८८ टक्के कच्च्या तेलाच्या आयातीचा मार्ग होर्मुजच्या सामुद्रधुनीतून जात असतानाही देशाने सामान्य ग्राहकांचे दैनंदिन जीवन जवळपास पूर्णपणे सुरळीत ठेवले. पेट्रोल आणि डिझेलचे दर स्थिर राहिले, एलपीजीचा पुरवठा अखंड सुरू राहिला आणि कोणतीही उघड टंचाई, रेशनिंग किंवा दैनंदिन व्यवहारांमध्ये अडथळे दिसून आले नाहीत. गेल्या दोन महिन्यांमध्ये जगाने अनेक दशकांमधील सर्वात गंभीर ऊर्जा संकटांपैकी एक अनुभवले. जगातील सुमारे २० टक्के कच्च्या तेलाचा आणि एलएनजी व्यापाराचा मार्ग असलेली होर्मुज सामुद्रधुनी पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे धोक्याच्या स्थितीत आली. कच्च्या तेलाच्या किंमती काही आठवड्यांमध्येच प्रति पिंप सुमारे ७३ डॉलरवरून १४४ डॉलरपर्यंत पोहोचल्या, म्हणजेच तब्बल ७२ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाली. शिपिंग खर्चात मोठी वाढ झाली, एलएनजी पुरवठा साखळीवर परिणाम झाला आणि जगभरातील अनेक सरकारांना इंधन रेशनिंग, ऊर्जा बचतीचे सल्ले, कमी कामकाजाचे आठवडे आणि थेट इंधन दरवाढ यांसारखी आपत्कालीन पावले उचलावी लागली.

जागतिक ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांनी या परिस्थितीला आखाती युद्धानंतरचे सर्वात गंभीर तेल पुरवठा संकट म्हटले. होर्मुजमधील अस्थिरता दीर्घकाळ टिकल्यास ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये महागाईची मोठी लाट येऊ शकते, असा इशाराही देण्यात आला. आंतरराष्ट्रीय अहवालांमध्ये वारंवार नमूद करण्यात आले, की ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोर पुरवठा सुरक्षित ठेवणे आणि ग्राहकांना वाढत्या महागाईपासून संरक्षण देणे, ही दुहेरी आव्हाने होती. उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, समन्वित धोरणात्मक नियोजन आणि दीर्घकालीन ऊर्जा तयारीमुळे भारताने घरगुती ग्राहकांवर जागतिक अस्थिरतेचा थेट परिणाम होऊ दिला नाही. अनेक अर्थतज्ज्ञांनी नमूद केले की, अनेक देशांनी कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किंमतींचा भार थेट ग्राहकांवर टाकला, तर भारताने मोठ्या प्रमाणावर हा ताण अंतर्गत पातळीवर शोषून घेत स्थैर्य टिकवून ठेवण्याचा मार्ग स्वीकारला. संकट तीव्र होत असताना भारताने अनेक पातळ्यांवर वेगाने पावले उचलली. रिफायनरीजना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे देशांतर्गत उत्पादनात मोठी वाढ झाली. नैसर्गिक वायूचा पुरवठा घरगुती वापर, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि खत उद्योगाला प्राधान्याने देण्यात आला, जेणेकरून अत्यावश्यक क्षेत्रांवर परिणाम होऊ नये.

भारताने आखाती देशांवरील अवलंबित्व कमी करत रशिया, अमेरिका, पश्चिम आफ्रिका आणि इतर प्रदेशांकडून कच्च्या तेलाची आयात वाढवली. धोरणात्मक साठे, उच्च क्षमतेने सुरू असलेल्या रिफायनरीज आणि मजबूत इंधन वितरण व्यवस्थेमुळे जागतिक बाजारातील अस्थिरतेच्या काळातही देशात अखंड पुरवठा सुरू ठेवणे शक्य झाले. दर नियंत्रणाच्या बाबतीतही सरकारने महत्त्वाची भूमिका बजावली. पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात करण्यात आली, तर सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी जागतिक कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किंमतींचा मोठा भार स्वतः उचलला. सर्वोच्च पातळीवर कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्या असताना, पेट्रोलवर प्रति लिटर सुमारे २४ रुपये आणि डिझेलवर जवळपास ३० रुपये इतका अतिरिक्त भार कंपन्यांनी शोषून घेतल्याचे सांगितले जाते. त्यामुळे जागतिक बाजारात प्रचंड दरवाढ झाली असतानाही देशांतर्गत किरकोळ इंधन दर स्थिर ठेवण्यात यश आले. जगातील इतर देशांच्या प्रतिक्रियांशी तुलना केली असता भारताचा दृष्टिकोन विशेष ठरला. बांगलादेशाने इंधन रेशनिंग सुरू केले. श्रीलंकेने चार दिवसांचा कामकाज आठवडा आणि इंधन पास प्रणाली लागू केली. फिलिपीन्सने राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी जाहीर केली, तर दक्षिण कोरियाने अनेक दशकांनंतर प्रथमच इंधन दरांवर मर्यादा आणल्या. युरोपमधील अनेक देशांना मोठ्या प्रमाणावर अनुदान योजना जाहीर कराव्या लागल्या, कारण किरकोळ इंधन दर झपाट्याने वाढत होते. याउलट भारताने कोणतीही मोठी दृश्यमान अडचण निर्माण होऊ न देता स्थैर्य कायम ठेवले.

ऊर्जा क्षेत्रातील निरीक्षकांच्या मते आज दिसणारी ही क्षमता आणि स्थैर्य हे अनेक वर्षांच्या संरचनात्मक गुंतवणुकीचे आणि धोरणात्मक सुधारणांचे परिणाम आहेत. गेल्या दशकात भारताने एलपीजी पायाभूत सुविधा वाढवल्या, आयात टर्मिनल्सची संख्या दुप्पट केली, रिफायनिंग क्षमता वाढवली, कच्च्या तेलाचे स्रोत २७ देशांवरून ४० देशांपर्यंत वाढवले, इथेनॉल मिश्रणाला गती दिली आणि स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह विकसित केले. तेल आणि वायू क्षेत्रातील विश्लेषकांच्या मते, याच दीर्घकालीन उपाययोजनांमुळे आज भारताला जगातील सर्वात कठीण ऊर्जा संकटांपैकी एक असलेल्या या संकटाचा सामना करण्यासाठी आवश्यक सुरक्षा कवच मिळाले आहे. दरम्यान, तेलाच्या वाढत्या किमती तेल शुद्धीकरण आणि विपणन कंपन्यांनी शोषून घेतल्यामुळे त्यांना रोजचा मोठा तोटा सहन करावा लागला. तेलपुरवठ्याबाबत निर्माण झालेली अनिश्चितता, होर्मुज सामुद्रधुनीतील तणाव आणि जागतिक बाजारातील दरवाढ यामुळे भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला. इंडियन ऑइल, बीपीसीएल आणि एचपीसीएल या सरकारी तेल कंपन्यांना गेल्या दीड महिन्यात तब्बल ३० हजार कोटी रुपयांचा तोटा झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र झाल्यानंतर जागतिक कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी अस्थिरता निर्माण झाली. विशेषतः होर्मुज सामुद्रधुनीमार्गे तेल आणि वायू पुरवठा विस्कळीत होण्याची भीती निर्माण झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर झपाट्याने वाढले. संघर्षापूर्वी प्रति पिंप सुमारे ७२ डॉलर असलेली ब्रेंट क्रूडची किंमत तणाव वाढल्यानंतर तब्बल १४४ डॉलर प्रति पिंप दरापर्यंत पोहोचली. नंतर दर काहीसे कमी झाले असले, तरी अद्याप शंभर डॉलर प्रति पिंपाच्या आसपास आहेत.

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत ५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली असताना भारतात मात्र पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किरकोळ दरांमध्ये २८ फेब्रुवारीनंतर कोणताही बदल करण्यात आला नाही. त्यामुळे वाढीव खर्चाचा थेट भार तेल विपणन कंपन्यांवर पडला. सूत्रांच्या माहितीनुसार, एप्रिल महिन्यात कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लिटर सुमारे १८ रुपये आणि डिझेलवर तब्बल २५ रुपये प्रति लिटर इतका तोटा सहन करावा लागला. या परिस्थितीतही सरकारी तेल कंपन्यांनी देशभरात इंधन आणि स्वयंपाक गॅसचा अखंड पुरवठा सुरू ठेवला; मात्र त्यासाठी त्यांना मोठी आर्थिक किंमत मोजावी लागली. वाढीव कच्चे तेल खरेदी खर्च, आपत्कालीन पुरवठा व्यवस्था, वाहतूक खर्च, विमा प्रीमियम आणि रिफायनरी समायोजन यामुळे कंपन्यांच्या आर्थिक अडचणी अधिक वाढल्या. सरकारने हस्तक्षेप करत पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात केल्यामुळे या कंपन्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. सूत्रांच्या मते, सरकारने प्रति लिटर दहा रुपयांची उत्पादन शुल्क कपात केली नसती, तर तेल कंपन्यांचा एकूण तोटा ६२ हजार पाचशे कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकला असता. सध्या हा तोटा सुमारे ३० हजार कोटी रुपयांपर्यंत मर्यादित ठेवण्यात यश आल्याचे मानले जात आहे.

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्या केवळ व्यावसायिक संस्था नसून देशाच्या ऊर्जा सुरक्षेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत. त्यामुळे जागतिक संकटाच्या काळात इंधनपुरवठा सुरळीत ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते; मात्र दीर्घकाळ अशा प्रकारचा तोटा सहन करणे या कंपन्यांसाठी आर्थिकदृष्ट्या धोकादायक ठरू शकते. याचा परिणाम त्यांच्या गुंतवणूक क्षमतेवर, पायाभूत सुविधांच्या विस्तारावर आणि भविष्यातील ऊर्जा प्रकल्पांवर होण्याची शक्यता आहे. पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक ऊर्जा बाजारातील अस्थिरता लक्षात घेता भारतासाठी ऊर्जा आयातीवरील अवलंबित्व कमी करणे ही दीर्घकालीन गरज असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. नवीकरणीय ऊर्जा, पर्यायी इंधन आणि देशांतर्गत उत्पादन वाढवणे या दिशेने अधिक वेगाने पावले उचलण्याची आवश्यकता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. सध्या तणाव काहीसा कमी होत असल्याचे दिसत असले, तरी जागतिक परिस्थिती अजूनही अनिश्चित आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या किंमती पुन्हा वाढू शकतात. अशा वेळी भारतीय तेल कंपन्यांवरील आर्थिक दबाव कायम राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, ऊर्जा सुरक्षेसोबतच आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवणे हे सरकार आणि तेल कंपन्यांसमोरचे मोठे आव्हान ठरणार आहे.

---

चर्चा आजची

# बियाणांच्या मुबलक पुरवठ्याची गरज



अंतरा पारंगे

पावसाळी हंगाम काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. भात लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना बियाणांसह खतांचा पुरवठा मुबलक प्रमाणात राहवा, यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागाने पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील बियाणे, खते आणि किटकनाशके विक्रीवर पथकामार्फत नजर ठेवली जाणार आहे. जिल्हास्तरावर पथकामार्फत विक्रेत्यांची तपासणी सुरु करण्यात आहे. शेतकऱ्यांची आर्थिक लूट आणि फसवणूक करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात कारवाई केली जाणार आहे. जिल्ह्यात शेकडो दुकाने आहेत. मात्र पेरणीच्या हंगामात अनेकवेळा बियाणे मिळत नसल्याची ओरड शेतकऱ्यांची कायमच आहे. शेतकऱ्यांचा हा प्रश्न सोडविण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. निसर्गाच्या खेळामुळे कधी पेरणी करणे अवघड होते. तर पेरणी केलेले बियाणे उगवेल याचीदेखील खात्री नसते. तरीदेखील मोठ्या आशेने शेतकरी आपले काम प्रामाणिकपणे करतात. मुबलक बियाणांच्या पुरवठ्याची गरज योग्य पद्धतीने सोडविणे आवश्यक आहे.

रायगड जिल्ह्याला पूर्वी भाताचे कोठार म्हणून संबोधले जात होते. परंतु वाढते नागरिकीकरण, औद्योगिकीरणामुळे शेतीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी झाले. लाखोमध्ये असलेले भाताचे क्षेत्र आता हजारोपर्यंत पोहचले आहे. भातशेती करण्याऐवजी अनेकजण विकण्यावर भर देत आहेत. त्यामुळेही शेत जमीनीचे क्षेत्र कमी झाले आहे. शेतजमीन क्षेत्र कमी होत असताना भात लागवडीचे क्षेत्र वाढावे तसेच भाताबरोबरच इतर पिकांची लागवड करण्यावर शेतकऱ्यांनी भर द्यावी, यासाठी कृषी विभाग कायमच प्रयत्न करीत आला आहे. भाजी लागवडीसह फळ पिक लागवडीच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र काही योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नसल्याने लागवडीचे क्षेत्र वाढण्यास अडचणी निर्माण होत आहेत. तरीदेखील जिल्ह्यातील शेतकरी अनेक अडचणींवर मात करीत भातशेती करीत आहे. पावसाच्या पाण्यावर सुमारे ९५ टक्केहून अधिक शेती आहे. सध्या उन्हाळी हंगाम आहे. मे महिना संपण्यासाठी पंधरा दिवस शिल्लक राहिले आहेत. पाऊस कधीही जिल्ह्यात कोसळण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी मशागतीच्या कामात व्यस्त झाला आहे. ही कामे अंतिम टप्प्यात असून बांधबंधिस्तीसह गवत काढणे, शेतावरील गवत, पालापाचोळा गोळा करणे, राब जाळणे अशी अनेक कामे करण्यामध्ये शेतकरी व्यस्त झाला आहे. काही ठिकाणी भात बियाणांसह खते आणण्याचे ही नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यामध्ये यंदा पाऊस लवकर पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. भात लागवडीसाठी बियाणे शेतकऱ्यांना वेळेवर मिळावी, यासाठी जिल्ह्यात भात बियाणांसह खते, किटकनाशके परवानाधारक विक्रेत्यांकडे पुरवठा करण्यास प्रशासनाकडून सुरुवात झाली आहे. जिल्ह्यामध्ये ९१ हजार ५२१ हेक्टर इतके भात लागवडीचे क्षेत्र आहे. यावर्षी ७३ हजार हेक्टरवर भात लागवड करण्याचे उद्दीष्ट कृषी विभागाने ठेवले आहे. जिल्ह्यात दोन हजार ८११ हेक्टर इतके नाचणीचे क्षेत्र आहे. यावर्षी दोन हजार ५५० हेक्टर क्षेत्राचे लक्षांक आहे.

रायगड जिल्ह्यासाठी खरीप हंगामासाठी (एक एप्रिल ते ३० सप्टेंबर) या कालावधीत १४ हजार मेट्रीक टन रासायनिक खतांचे आवंटन प्राप्त आहे. यात ११ हजार टन युरिया, ७०० टन डिएपी, एक हजार ५०० मेट्रीक टन मिश्र खतांचा समावेश असणार आहे. आतापर्यंत एक हजार ६८७ मेट्रीक टन रासायनिक खत प्राप्त झाले आहेत. खरीप हंगामात खतांची टंचाई निर्माण होऊ नये, म्हणून एक हजार १२० मेट्रीक टन खतांचा संरक्षित साठा करण्यात येणार आहे. यापैकी ९३८ मेट्रीक टन संरक्षित साठा करण्यात आला आहे.

जिल्ह्यासाठी १६ हजार ९५० क्विंटल बियाणांची मागणी नोंदविण्यात आली आहे. यात १६ हजार क्विंटल सुधारीत तर ६० क्विंटल संकरीत भात बियाणांचा समावेश असणार आहे. तसेच महाबीजसह इतर खासगी कंपन्यांकडून बियाणे उपलब्ध केली जाणार आहेत. आतापर्यंत चार हजार ३३३ क्विंटल बियाणांचा पुरवठा झाला आहे. बियाणे पुरवठा चालू असून आवश्यकतेनुसार, बियाणे उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यामध्ये बियाणांसह खतांचा अनधिकृत साठा किंवा गैरवापर आढळल्यास विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाई केली जाणार आहे. जिल्ह्यात १८८ बियाणे, २४० खते आणि १३६ किटकनाशके परवानाधारक विक्रेते आहेत. या विक्रेत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी कृषी विभागाने जिल्हा स्तरावर पथक तयारे केले आहे. या पथकामार्फत विक्रेत्यांची तपासणी सुरु केली आहे. खते, बियाणे, किटनाशके विक्रीच्यावेळी शेतकऱ्यांची अडवणूक, फसवणूक व आर्थिक लुट होत असल्यास त्यांच्याविरोधात पथकामार्फत कारवाई केली जाणार आहे. शेतकऱ्यांची आर्थिक लुट थांबविण्यासाठी कृषी विभागाने उचललेले पाऊल कौतुकास्पद आहे. मात्र जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांना पेरणीसाठी वेळेवर बियाणे भेटत नाही, अशा तक्रारी दरवर्षी आहेत. त्यावर मात्र ठोस उपाय केल्यास जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मुबलक बियाणे मिळण्यास मदत होईल. शेतकऱ्यांना या कालावधीत मुबलक आणि चांगल्या दर्जाच्या बियाणांची गरज आहे. त्याचा विचार कृषी विभागाने करावा, हीच माफक अपेक्षा आहे.

---

लोकसंसद

## पेपर फुटीला शिक्षण क्षेत्रातील सारेच घटक जबाबदार

नुकताच नीट परीक्षेचा पेपर अगोदरच फुटला. मुख्य म्हणजे याची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापासून ते राजस्थान, गुजरात पर्यंत पोहचली आहे आत्ता पर्यंत सुमारे पाच राज्यात हे लोण पसरले आहे. आत्तापर्यंत सीबीआयने तपास वेगाने सुरु केला असून त्याची व्याप्ती मोठी आहे. सध्या खाजगी शिकवणी वर्गाचे पेव फुटले आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थी महाविदलयात जात नाहीत. त्या ऐवजी ते शिकवणीला जातात. साहजिकच महाविद्यालये नावालाच आहेत. पेपर सेट करणाऱ्या लोकांची सुद्धा भूमिका महत्वाची आहे. त्यांनीच पैशाच्या अमिषाच्या हेतूने व शिकवणी क्लासच्या मदतीने पेपर फोडण्याचे काम केले. यात क्लास चालकांची सहकार्याची भूमिका व पैसे कमावण्याचा धंदा सुरु केला. एक क्लास चालकाने आपल्या मुलाला पेपर फोडून कारवाई केली. हे त्यांने केवळ मुलाला वैद्यकीय महाविद्यालय काढण्याच्या हेतूने केले असे समोर येत आहे. पेपर सेट करणारे पुण्यातील काही शिक्षकांनी यात हातभार लावून पेपर फोडीस सहकार्य केले. हे पेपर फुटीचे प्रकरण इतुक्या वेगाने पुढे गेले कि यात किती लोक सामील आहेत हे समजण्यास कित्येक दिवसांचा वेळ जाईल. या पेपर फुटीमुळे अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. पैशाचा अनाठायी अपव्यय होत आहे. इतर काही प्रवेश सुद्धा उशिरा होणार आहेत सुमारे २२ लाख विद्यार्थी या परीक्षेला बसले होते सरकारने पेपर व्यवस्था अतिशय कडक करावयास हवी. पेपर सेट करणार्यांना पेपर फोडल्यास अतिशय कडक शिक्षेची तरतूद करणे आवश्यक आहे. पेपर सेट केल्यानंतर त्यांना परीक्षेपर्यंत बाहेर संपर्क करण्यास मनाई करावी. याशिवाय शिक्षण तज्ज्ञांनी जे उपाय सुचविले आहेत ते सुद्धा अमलात आणावेत. देशातील केंद्र सरकारमधील शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा.

**– शांताराम वाघ, पुणे**

---

दिनविशेष

# जागतिक कासव दिन

२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप म ानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून

असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरूनकासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे,



शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ मे

१)श्री.मुधकर कमलाजी तळकर रामनाथ, अलिबाग, २३-५-१९५०

२) श्री.प्रकाश कृष्णराव गंधारे घुमकर वाडी,अलिबाग, २३-५-१९४७

३)श्रीम.प्रतिभा राजाराम डबरी नागडोंगरी, अलिबाग दि.२३-५-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## पती-पत्नी पोलीस दलात रूजू

**खांब :** रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र तळवली तर्फे अष्टमी येथील रहिवासी असणारे मधुकर मोरेश्वर मरवडे यांचे सुपुत्र सौरभ मरवडे व सुन प्रतिक्षा सौरभ मरवडे (प्रचिती राजेंद्र शिगवण) यांना ही पोलीस खात्यातील भरतीची सुवर्णसंधी मिळाली असून त्यांची मेहनत फळास आली असल्याचे बोलले जात आहे. गत वर्षीच सौरभ आणि प्रचिती विवाहबद्ध झाले. विवाहबद्ध झाल्यापासून पोलीस खात्यामध्ये भरती होण्याचा त्यांनी ठाम निर्धार करून व त्या दृष्टीने त्यांनी सातत्याने प्रयत्न केले व त्यांचे प्रयत्न अखेर फळास आली असून एकाच दिवशी पोलीस दलात निवड झाल्याचे पत्र त्यांना मिळाले. तर शासकीय स्तरावर सर्व गोष्टींची पूर्तता झाल्यावर अखेर सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस सेवेत दोघेही रूजू झाले आहेत. सौरभ आणि प्रचिती यांची सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलात नियुक्ती झाल्याबद्दल ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, त्यांचे आप्तस्वकीय व मित्र परिवार यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## रायगडच्या विद्यार्थ्यांची थेट इस्त्रोवारी

**नागोठणे :** कोल्हापूर गुरुकुल एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत रायगड जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यावेळी जिल्ह्यातील चार विद्यार्थ्यांची थेट इस्रो भेटीसाठी निवड झाल्याने जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. एकूण ३,६१७ विद्यार्थ्यांमधून रायगडच्या चार विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविल्याने रायगड जिल्ह्याचा शैक्षणिक डंका राज्यभर झाला आहे. गुरुकुल एज्युकेशन सोसायटी ही संस्था इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंत मराठी, सेमी इंग्लिश, इंग्लिश व उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी २०११ पासून स्पर्धा परीक्षा आयोजित करत आहे. रायगड जिल्ह्यात प्रथमच ही परीक्षा अशोक अहिरे यांच्या देखरेखीखाली घेण्यात आली. यासाठी पोलादपूर, कर्जत, खोपोली, उरण, खारघर ते पनवेलपर्यंत सातत्याने दौरे करून शिक्षक व पालकांमध्ये स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले. परिणामी, संपूर्ण रायगड जिल्ह्यातून तब्बल ३६१७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. दि.२५ जानेवारी रोजी झालेल्या स्पर्धा परीक्षेत रायगड जिल्ह्यातून प्रथमच चार विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर विशेष यश मिळवत इस्रो भेटीसाठी निवड मिळवली आहे.

# माथेरानच्या मुख्य रस्त्याचे विद्रुपीकरण

## ● गतवैभव प्राप्त करून देण्यास प्रशासन असमर्थ

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमधील मुख्य रस्त्यावरील मॉल रोडच्या कडेला अनधिकृत पणे पत्र्याच्या शेड उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे रस्त्याचे विद्रुपीकरण झाले आहे. दरम्यान, माथेरानला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सध्या सत्तेत सहभागी असणारी मंडळी कार्यक्षम दिसत असतानाच हे विद्रुपीकरण काढण्यास प्रशासन असमर्थता का दर्शवित आहे, असा प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे.

माथेरानमधील रेस्टॉरंट किंवा एखाद्या छोट्या हॉटेलच्या मालकांनी आपल्या वास्तू वार्षीक भाडेतत्त्वावर दिलेल्या आहेत. आणि जे कोणी या वास्तूंचे माळी (भाडेकरू) आहेत त्यांनी रस्त्याच्या कडेला नगरपरिषदेच्या गटारांवर पत्र्यांचे कंपाउंड टाकून स्वतःच्या मालकीची जागा समजून व्यापलेली आहे. त्यामुळे या गटारात उतरून कचरा गोळा करण्यासाठी सफाई कामगारांना त्रासदायक ठरत आहे. एवढेच नव्हे तर हे भाडेकरू नगरपरिषदेच्या रस्त्यावर वृक्षारोपण करून देण्यासाठी सुद्धा आडकाठी आणताना दिसत आहेत. त्यासाठी त्यांना कुणाचे पाठबळ मिळत आहे, याबाबत तर्कवितर्क केले जात आहेत.




दरम्यान, मुख्य रस्त्याच्या गटारांवर लावलेल्या पत्र्यांच्या अनधिकृत कामी मुख्याधिकारी यांना लेखी निवेदने दिले आहे. तरीसुद्धा प्रशासन अशा कामांकडे दुर्लक्ष करताना दिसत असल्याने याबाबत स्थानिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. लवकरच ही पत्र्यांची कंपाऊंड काढून टाकावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. तसेच, अशा अनधिकृत कामांबाबतीत अभ्यासू लोकप्रतिनिधी आणि मुख्याधिकारी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

> **“माथेरान नगरपरिषदेच्या माध्यमातून मुख्य बाजार पेठ पर्यटन वाढीच्या दृष्टीने विकसित करण्याचा आमचा मानस असून, त्याचा भाग म्हणून आम्ही मुख्य रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण केले आहे. काही व्यवसायिकांनी रस्त्यावर पत्रा लावून जागा अडविली असून, बाजारपेठ अस्वच्छ करण्याचे काम केले आहे. नजीकच्या काळात या जागाचे सुशोभित करून याठिकाणी पर्यटकांना बसण्याची व्यवस्था केली जाणार आहे.**
>
> **– शिवाजीराव शिंदे, सभागृह गटनेते”**



# फ्लेमिंगोंसाठी पर्यावरणप्रेमी आक्रमक

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

पाम बीच परिसरातील एनआरआय कॉलनीलगतच्या खाडीत दरवर्षी लाखोंच्या संख्येने दाखल होणारे लालसर रंगाचे फ्लेमिंगो सध्या पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत आहेत. हजारो किलोमीटरचा प्रवास करून नवी मुंबईत येणाऱ्या या स्थलांतरित पक्ष्यांना पाहण्यासाठी दररोज मोठ्या प्रमाणावर पर्यटक, पक्षीप्रेमी आणि छायाचित्रकार येथे गर्दी करत आहेत.

सकाळी आणि सायंकाळच्या वेळेत फ्लेमिंगोंचे सुंदर दृश्य आपल्या कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी छायाचित्रकारांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. संपूर्ण परिसर गुलाबी रंगात न्हाऊन निघाल्याने पर्यटकही या निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेत आहेत. मात्र या परिसरात विकास प्रकल्प उभारण्याच्या चर्चेमुळे पर्यावरणवाद्यांनी चिंता व्यक्त केली आहे. ‘‘लाखो मैलांचा प्रवास करून येणाऱ्या फ्लेमिंगोंचा अधिवास धोक्यात घालून विकास कशासाठी?’’ असा सवाल पर्यावरणप्रेमी उपस्थित करत आहेत.

फ्लेमिंगोंचे संरक्षण करण्यासाठी विविध पर्यावरणवादी संघटना मैदानात उतरल्या असून त्यांना नागरिकांचाही

### ● ‘‘निसर्ग वाचवा’’ची मागणी जोरात

मोठा पाठिंबा मिळत आहे. हजारो नागरिकांनी सामाजिक माध्यमांसह विविध स्तरांवर ‘‘फ्लेमिंगो वाचवा, खाड्या वाचवा’’ अशी भूमिका घेतली आहे.

निसर्ग आणि जैवविविधतेचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त होत असून प्रशासनाने विकासासोबत पर्यावरणाचाही समतोल राखावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# ‘बंबल’ ॲपवरील मैत्री पडली महाग

## ● तरुणाची लाखो रुपयांची फसवणूक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बंबल डेटिंग ॲपवर झालेल्या मैत्रीतून मुंबईतील एका व्यक्तीची तब्बल २१.५ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे.

भायखळा येथे राहणारा ३८ वर्षीय तरुण इंटिरियर डिझायनर आहे. काही दिवसांपूर्वी त्याची बंबल डेटिंग ॲपवर एका अज्ञात तरुणीशी ओळख झाली. हळूहळू त्या तरुणीने तरुणाचा विश्वास संपादन केल्यानंतर, त्या तरुणीने त्याला ऑनलाईन शेअर्स आणि फॉरेक्स ट्रेडिंगची माहिती दिली. कमी कालावधीत प्रचंड नफा कमावता येतो, असा दावा तिने केला. तिने त्याला डार्विनएक्स नावाच्या प्लॅटफॉर्मद्वारे पैसे गुंतवण्याचा सल्ला दिला आणि भरघोस परतावा मिळवून देण्याचे आश्वासन दिले.तरुणीवर विश्वास ठेवून पीडित तरुणाने १ एप्रिल रोजी सुरुवातीला ५० हजार रुपयांची गुंतवणूक केली. गुंतवणूक केल्यानंतर एका बनावट डॅशबोर्डवर त्याला मोठा नफा दिसत होता. हा आभासी नफा पाहून पुढे तरुणाने आरोपींनी दिलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यांवर एकूण २१.५ लाख रुपये ट्रान्सफर केले.गुंतवणूक केल्यानंतर तरुणाने जेव्हा त्याच्या अकाउंट डॅशबोर्ड तपासला, तेव्हा त्याला त्यावर तब्बल ६९ लाख रुपयांचा नफा दिसत होता. सायबर चोरांनी त्याला सांगितले की, ६९ लाख रुपये काढण्यापूर्वी त्याला एकूण रकमेवर ३० टक्के ॲडव्हान्स टॅक्स भरावा लागेल. वारंवार आणखी पैशांची मागणी करत असल्याने तरुणाला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्याने सायबर क्राईम हेल्पलाइनशी संपर्क साधून तक्रार नोंदवली.

पान १ वरुन

## पात्र मतदार सुरक्षित

आयोगाने पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली.राज्यातील ही मोहीम २९ जुलै २०२६ पर्यंत सुरू राहणार असून यासाठी १ लाखांहून अधिक बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) नियुक्त करण्यात आले आहेत. हे कर्मचारी घराघरांत जाऊन मतदारांची माहिती तपासणार, डुप्लिकेट नावे शोधणार तसेच स्थलांतरित मतदारांची नोंद अद्ययावत करणार आहेत.

मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये पुनर्विकासामुळे अनेक नागरिक स्थलांतरित झाले असल्याने संबंधितांनी स्थानिक बीएलओशी संपर्क साधून आवश्यक फॉर्म भरावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. तसेच बीएलओ भेटीदरम्यान घरी कोणी नसल्यास २९ जुलैनंतरही मतदारांना नाव नोंदविण्याची संधी उपलब्ध राहणार असल्याचे चोकलिंगम यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नागरिकांना घरबसल्या माहिती अद्ययावत करता यावी यासाठी निवडणूक आयोगाने ‘ऑनलाईन सेल्फ मॅपिंग’ची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. पडताळणी प्रक्रियेदरम्यान मतदारांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची संपूर्ण संधी दिली जाणार असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले.

## ...मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई

मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचालित नौकांना त्यातून सूट देण्यात आली आहे. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यंत्रचलित व यांत्रिक नौकांनी १ जूनपूर्वी बंदरात परतणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच ३१ जुलैपर्यंत अथवा त्यापूर्वी या नौकांना समुद्रात मासेमारीसाठी जाण्यास मनाई करण्यात आली आहे, असे पाटील यांनी सांगितले. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर, म्हणजे किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपुढे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या नौकांवर केंद्र शासनाचे स्वतंत्र धोरण व मार्गदर्शक सूचना लागू राहतील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, पावसाळी मासेमारी बंदीचे उल्लंघन करून राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी करताना कोणतीही यंत्रचलित किंवा यांत्रिक नौका आढळल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ च्या कलम १४ अन्वये संबंधित नौका, मासेमारी साहित्य, उपसाधने आणि मासळी जप्त करण्यात येणार आहे. तसेच कलम १७ नुसार कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. बंदी कालावधीत मासेमारी करताना अपघात झाल्यास संबंधित नौकांना शासनाकडून कोणतीही नुकसानभरपाई मिळणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच या कालावधीत राज्याच्या सागरी जलधीत मासेमारी नौकांच्या अवागमनालाही प्रतिबंध राहणार आहे. सर्व मच्छिमार सहकारी संस्था, नौकामालक, सभासद आणि संबंधितांनी या आदेशाची नोंद घेऊन नियमांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, अलिबाग कोळीवाडा, बंदर रोड, कस्टम हाऊसजवळ, अलिबाग येथे दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२९५२२१ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## रोबोटीक बोयो ठरला देवदूत!

(२०) ही तरुणी अचानक समुद्रातील पाण्याच्या प्रवाहात खोल पाण्यात ओढली जाऊ लागली. ही बाब स्थानिकांच्या लक्षात आली. यावेळी समुद्रकिनारी असलेले पोलीस शिपाई प्रवीण रोटकर आणि पोलीस शिपाई जितेंद्र माने यांनी सतर्कता दाखवत घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून या पोलीस कर्मचाऱ्यांनी वॉटर क्राफ्टच्या (रोबोटिक बोयो) मदतीने वेगाने समुद्रात धाव घेतली. पाण्यात बुडणाऱ्या सिद्धी साबळे या तरुणीला सुखरूप बाहेर काढण्यात आले.

## वादातून पत्नीचा पतीच्या गुप्तांगावर चाकूहल्ला

गुन्हा दाखल करुन तिचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील ४५ वर्षीय जखमी पती रिक्षा चालक असून, तो तळोजा गावात एकत्र कुटुंबासह राहण्यास आहे. मात्र, या रिक्षा चालकाच्या पत्नीला एकत्र कुटुंबामध्ये राहायचे नव्हते. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून या दोघा पती-पत्नीमध्ये याच कारणावरून वाद सुरु होते. तसेच त्यांच्यामध्ये वारंवार भांडणदेखील होत होते. याच कौटुंबिक कारणावरुन या रिक्षा चालकाच्या पत्नीने पतीचे पुरुषत्व भंग करण्याच्या उद्देशाने धारदार चाकूने थेट त्याच्या गुप्तांगावर वार करुन गंभीर दुखापत केली. यावेळी सासू वाचवण्यासाठी धावून आली असताना, या विवाहितेने तिच्यावरही घरात असलेले गरम पाण्यासारखे कडक द्रव्य तिच्या तोंडावर ओतून तिलादेखील दुखापत केली. या क्रूर कृत्यानंतर या विवाहितेने गुन्ह्यात वापरलेला चाकू सोबत घेऊन रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत घरातून पलायन केले. या घटनेनंतर जखमी पती व सासू या दोघांनी रुग्णालयात उपचार घेऊन तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेतील फरार झालेल्या विवाहितेच्या शोधासाठी पोलीस पथक रवाना करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांनी दिली.

## रायगडात अवकाळी पावसाची हजेरी

म्हसळा, श्रीवर्धन, कर्जत खोपोली परिसरात दुपारनंतर आभाळ भरून आले. मेघगर्जना, ढगांच्या गडगडाटासह पाऊस सुरू झाला. अचानक वातावरण बदलून पाऊस सुरू झाल्यामुळे अनेकांची तारांबळ उडाली. परंतु, या अवकाळीमुळे रायगडकरांना उष्म्यापासून काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

## टँकरमुक्त रायगडच्या घोषणा हवेतच

परिस्थिती पेण तालुक्यात असून, येथे ९ गावे आणि ७६ वाड्यांसाठी १२ टँकर कार्यरत आहेत. या माध्यमातून २४ हजार ७६५ नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे. महाड तालुक्यात १४ गावे आणि ८७ वाड्यांसाठी ९ टँकरद्वारे २२ हजार २४३ नागरिकांना पाणी दिले जात आहे. पनवेल तालुक्यात १० गावे आणि ८ वाड्यांसाठी ९ टँकर सुरू असून, १८ हजार ५५३ नागरिक त्यावर अवलंबून आहेत. कर्जतमध्ये ३ गावे व ११ वाड्यांसाठी ८ टँकर, तर खालापुरात ५ गावे व ९ वाड्यांसाठी ६ टँकर कार्यरत आहेत. माणगावमध्ये ४ गावे व १५ वाड्यांसाठी ५ टँकर सुरू आहेत. याशिवाय अलिबागमध्ये ४ गावे, उरणमध्ये ४ वाड्या, सुधागड-पाली तालुक्यात २ वाड्या, रोहा तालुक्यात ३ गावे, पोलादपूर तालुक्यात ५ गावे व १४ वाड्या, म्हसळा तालुक्यात ६ गावे व १ वाडी, तसेच श्रीवर्धन तालुक्यात १ गाव व ३ वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. दरवर्षी उन्हाळ्यात टँकरची संख्या वाढत असताना दीर्घकालीन जलस्रोत निर्मिती, पाणी साठवण आणि जलव्यवस्थापनाच्या योजनांवर प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. अनेक गावांमध्ये जलजीवन योजनेची कामे अपूर्ण असल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन पाणीपुरवठ्यावर लक्ष ठेवून असल्याचा दावा केला जात असला, तरी ‘टँकरमुक्त जिल्हा’ करण्याच्या घोषणा प्रत्यक्षात फोल ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## परप्रांतीय तरुणाची आत्महत्या

आला नाही. त्यामुळे मालक त्याला खोलीमध्ये बघायला गेले. त्यावेळी दरवाजा बाहेरून उघडला गेला नाही. अखेर दरवाजा उघडल्यावर तो लटकलेला दिसून आला. या घटनेची माहिती मिळताच अलिबाग पोलिसांनी धाव घेतली. प्राथमिक तपासणी करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर मृतदेह अलिबामधील जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. मृत तरुणाच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र, तो सतत मोबाईलवर कोणाशी तरी संवाद साधत असल्याची माहिती चर्चेतून उपलब्ध झाली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे आशिल श्री. मिलिंद काशिनाथ नाईक व सौ. सिमा मिलिंद नाईक दोघेही रा. नानाचौक मुंबई व सध्या रा. नालधे ता. कर्जत, जि. रायगड यांनी खाली वर्णन केलेल्या जमिनीच्या मिळकती त्या मिळकतींचे मालकांकडून रजिस्टर्ड साठेकरार करून विकत घेतलेल्या आहेत. त्या मिळकतींचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन येणेप्रमाणे

**मौजे नालधे ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकती**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ७१ | २ अ | १.६२.0 | 0.७८ |
| ७१ | २ ब | १.७0.0 | 0.९0 |

येणेप्रमाणे जमिनींच्या मिळकती तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध सुद्धा हा या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतींपैकी सर्व्हे नं ७१/२ अ ही मिळकत आमचे आशिलांनी त्या मिळकतीचे मालक श्री अनंत पांडूरंग हरपुडे रा. कशेळे ता. कर्जत यांचेकडून रजिस्टर्ड साठेकराराने त्यांना त्याच दिवशी किंमतीची संपुर्ण रक्कम देवून विकत घेतलेली असून ती सन् २000 पासून आमचे आशिलांचे प्रत्यक्ष ताबेकब्जात आहे. तसेच वरील मिळकतींपैकी सर्व्हे नं ७१/२ ब ही मिळकत आमचे आशिलांनी त्या मिळकतीचे मालक व कब्जेदार श्री. शिवाजी काळू बोराडे व श्री. राम काळू बोराडे रा.कशेळे ता. कर्जत यांचेकडून ता. २२/0१/२000 रोजीचे साठेकराराने विकत घेवून त्याचवेळी किंमतीची संपुर्ण रक्कम अदा करून प्रयक्ष ताबेकब्जात घेतलेली आहे. अशा प्रकारे सदर दोन्ही मिळकती रजिस्टर्ड साठेकराराने आमचे आशिलांचे प्रत्यक्ष ताबेकब्जात व वहिवाटीस आहेत. केवळ सदर मिळकती कूळकायद्यातील तरतूदींप्रमाणे जमिन मालकांनी विक्री परवानगी आणून खरेदीखते आमचे आशिलांचे लाभात रजिस्टर्ड करून दिली नाहीत. त्यामुळे ७/१२ उतारे मूळ मालकांचे नावे तसेच राहिले, याचा गैरफायदा घेवून कशेळे गावातील श्री. मंगेश शिवाजी बोराडे व श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र हरपुडे यांनी आमचे आशिलांचे अपरोक्ष सदर मिळकती बेकायदेशीर मार्गाने स्वतःचे नावे करून घेवून सदर मिळकती परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणेचा प्रयत्न चालवला आहे. परंतु सदर दोन्ही मिळकती वर उल्लेख केलेल्या साठेकरारानुसार आमचे आशिलांचे प्रत्यक्ष ताबेकब्जात असून त्या आमचे आशिलांनी विकसित केल्या असून त्यामध्ये निरनिराळ्या प्रकारची झाडे लावून त्यांची जोपासना व देखभाल करीत आहेत व सदर मिळकती सभोवती तारेचे कुंपण केलेले आहे.

परंतु सदर मिळकती श्री. मंगेश शिवाजी बोराडे व श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र हरपुडे यांचे नावे ७/१२ उताऱ्यास बेकायदेशीरपणे आहेत याचा गैरफायदा घेवून ते सदर मिळकती आमचे आशिलांचे अपरोक्ष त्रयस्थ इसमांना विक्री करणेचा प्रयत्न करीत आहेत. आमचे आशिलांनी त्याचेविरूद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

तरी सदर मिळकतींबाबत आमचे आशिलांचे लेखी संमतीशिवाय इतर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार अथवा दस्तऐवज करू नयेत व आमचे आशिलांचे ताबेकब्जास हरकत करू नये. केल्यास आमचे आशिलांना संबंधीत सर्व इसमांचेविरूद्ध योग्य ती दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाई सुरू करणे भाग पडले व सदरचा व्यवहार/दस्तऐवज आमचे आशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

कर्जत
ता.२३/0५/२0२६
मो.नं.९८२२६0९८५३

**ॲड.अजय मेढी**
मल्हार अपार्टमेंट,
विठ्ठल मंदिरजवळ दहिवली नीड कर्जत रायगड
(श्री.मिलिंद नाईक व सौ.सिमा नाईक यांचेतर्फे ॲडव्होकेट)

# निवडक




## तळामध्ये केमिस्टच्या संपाला प्रतिसाद

**तळा :** मेडिकल दुकानदारांनी विविध मागण्यांसाठी पुकारलेल्या कडकडीत बंदला तळामध्ये उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. मात्र आरोग्य सेवा व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला. सकाळपासूनच तळा शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा आणि रुग्णालय परिसरातील बहुतांश औषधांची दुकाने बंद दिसून आली. या बंदमुळे रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि नियमित औषधांवर अवलंबून असलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय झाली. मेडिकल असोसिएशनच्या वतीने सरकारच्या धोरणांविरोधात, ऑनलाईन औषध विक्रीवर नियंत्रण, परवान्यांच्या अटींमधील बदल, तसेच वाढत्या प्रशासनिक कारवाईच्या निषेधार्थ हा बंद पुकारण्यात आला होता. व्यापाऱ्यांनी सरकारने औषध विक्रेत्यांशी चर्चा न करता निर्णय घेतल्याचा आरोप केला.या बंदमुळे सर्वाधिक फटका सर्वसामान्य नागरिकांना बसला. अनेक रुग्णांना आवश्यक औषधे मिळाली नाहीत. काही नागरिक रुग्णालयांबाहेर औषधांसाठी फिरताना दिसले. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार यांसारख्या दीर्घकालीन आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. काही सामाजिक संघटनांनी अशा आंदोलनांदरम्यान आपत्कालीन औषध सेवा सुरू ठेवण्याची मागणी केली. दरम्यान, मागण्या मान्य न झाल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा मेडिकल संघटनांनी दिला आहे.



## उन्हाळी सुट्टीत मैदानांवर शुकशुकाट

**पनवेल :** शाळांना उन्हाळी सुट्टी लागताच लहान मुलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होत असते. काही मुले आपल्या गावी जाणे पसंत करतात, तर अनेक जण सकाळपासून रात्रीपर्यंत परिसरातील मैदानांवर क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी यांसारखे विविध खेळ खेळताना दिसतात. काही नागरिक चालणे, व्यायाम तसेच मित्रांसोबत वेळ घालवण्यासाठी मैदानांवर येत असतात. मात्र यंदाच्या वर्षी अनेक मैदानांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. दररोज वाढणारे तापमान, अंगाची लाही लाही करणारा उकाडा आणि वाढता उष्मा यामुळे नागरिकांसह लहान मुलांनीही मैदानांकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे. दुपारच्या वेळेत मैदान पूर्णपणे ओस पडत असून सायंकाळीही पूर्वीसारखी गर्दी दिसून येत नाही. उष्णतेमुळे घराबाहेर पडणे कठीण होत असल्याने मुलांचा कल मोबाईल, टीव्हीकडे वाढत आहे. सुट्टी हा शब्द मुलांसाठी आनंद, खेळ आणि मैत्रीचे नाते निर्माण करणारा मानला जातो. मात्र वाढते प्रदूषण, झाडांची कत्तल, कॉँक्रीटीकरण आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास यामुळे ऋतूंचे स्वरूप बदलताना दिसत आहे. त्याचा परिणाम आता थेट दैनंदिन जीवनावर जाणवत असून भविष्यात याची मोठी किंमत पुढील पिढीला मोजावी लागू शकते, अशी चिंता पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे. पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करणे ही काळाची गरज बनली आहे.

## हरवलेले मोबाईल मूळ मालकांस परत

**पालघर :** पालघर पोलिसांनी हरवलेल्या मोबाईल फोनच्या शोधासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले. वाडा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे डिसेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत हरवलेले विविध कंपन्यांचे तब्बल ४८ मोबाईल फोन शोधून काढण्यात यश मिळवले आहे. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईल फोनची एकूण किंमत ११ लाख ७० हजार ७०० रुपये इतकी असून संबंधित मोबाईल धारकांना ते परत करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील श्री. देविदास शांताराम खैरे, यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गौरव भास्कर ठाकरे यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| टाकवे | ७२/४/अ | 0.२१.00<br>पो.ख. 0.0१.२0<br>एकूण : 0.२२.२0 | १.७९ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी. हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. २३/0५/२0२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली. सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१0.
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड. पिन-४१0२0१.
मो. ९२२0६५३३0२/८४४६७२४९८८

**जाहीर सुचना**

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नं. २७२ ह्या मिळकतीमधील ग्रामपंचायत घर क्र. ३४७८, क्षेत्र ३३0 चौरस फूट क्षेत्रफळाचा वाणिज्य गाळा श्री. अरविंद अनंत घरत, राहणार चौल तुलाड देवी, अलिबाग, यांच्या मालकीचा असून, सदरील वाणिज्य गाळा सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर वाणिज्य गाळा पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा सदरील मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 0८ (आठ) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : १८/0५/२0२६.

सही/
**(ॲड.संजय महादेव भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

दिनांक : २३ मे २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - शिलार, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) भालचंद्र विश्वनाथ अंबिके<br>२) प्रकाश दामोदर आणेकर | १२ | ५/अ | ३-५५-० | १ | ४० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-

**ॲड. भुपेश तानाजी पेनारे**

कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

मो. नं. ९१५८२७७७२८

दिनांक :- २३/०५/२०२६

दिनांक : २३/०५/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) वृषाली विवेक चौधरी, २) हर्षदा हरिश्चंद्र म्हात्रे, ३) अमृता राजू टिवळेकर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तळवली ता.मुरुड | ३३६ | २-११-१०<br>पो.ख. ०-२६-६०<br>एकुण क्षेत्र २-३७-७० | २७.२६/- |

वर नमुद मिळकतीमधील खाते क्र. ५५४ क्षेत्र ०-२०-०० हे.आर., पो.ख. ०-०३-१५ हे.आर. एकुण क्षेत्र ०-२३-१५ हे.आर., आकार २.५८/- रु. पैसे या मिळकतीमधील १) वृषाली विवेक चौधरी, २) हर्षदा हरिश्चंद्र म्हात्रे, ३) अमृता राजू टिवळेकर यांचा असलेला अविभक्त हिस्सा

दिनांक : २३/०५/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकती व घर मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक मंदा हरेश्वर म्हात्रे, विनीत हरेश्वर म्हात्रे, विभावरी कृपाल खोत, मालती विजय म्हात्रे, वनिता गोविंद म्हात्रे, आशा जयवंत गावंड, स्नेहा संजय म्हात्रे, मुक्ताबाई रमेश म्हात्रे, निलेश रमेश म्हात्रे, नयना रविंद्र घरत, शाम पंढरीनाथ म्हात्रे, राजश्री रविंद्र राऊळ, इंदिरा पंढरीनाथ म्हात्रे, विद्या संजय पुकाळे यांचेकडून खरेदी घेण्याचा करार केला आहे. त्याकरीता खाली नमूद मिळकतीवरील मालकी हक्कांची तपासणी करणेची आहे. मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चिंचवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १६/३ | ००-६०-२० | ११.८७ |
| १६/४ | ००-१६-७० | ३.६९ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणा व्यक्ती, आर्थिक संस्था, बँका, भागीदारी संस्था, कंपनी इत्यादी यांचा गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, कुळ हक्क, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा न्यायालयीन वाद, एफ. एस. आय. टी. डी. आर. वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती वरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून तसा दाखला देण्यात येईल आणि माझे अशिल वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २२/०५/२०२६

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकती व घर मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक शशिकांत रामचंद्र ठाकूर, संतोष रामचंद्र ठाकूर, सुलभा रमेश पाटील, चेतन महादेव पाटील, नूतन नितीन पाटील, मिलन महादेव पाटील, सायली संतोष ठाणगे, सिताराम दत्तात्रेय गोंधळी, शितल रविंद्र पाटील यांचेकडून खालील नमुद मिळकतीमधील क्षेत्र निरंतर वहिवाटीच्या रस्त्याचे कराराने हस्तांतरीत करुन घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीता खाली नमूद मिळकतीवरील मालकी हक्कांची तपासणी करणेची आहे. मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चिंचवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १८/१/२ | ००-४०-८० | ४.७४ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणा व्यक्ती, आर्थिक संस्था, बँका, भागीदारी संस्था, कंपनी इत्यादी यांचा गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, कुळ हक्क, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा न्यायालयीन वाद, एफ. एस. आय. टी. डी. आर. वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती वरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून तसा दाखला देण्यात येईल आणि माझे अशिल वर नमूद मिळकतीमधील क्षेत्र निरंतर वहिवाटीच्या रस्त्याचे कराराने हस्तांतरीत करुन घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २२/०५/२०२६

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

दिनांक : २३/०५/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक अनहिता साहिल अग्रवाल यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | २४०८/१ | ०-०५-३०<br>पो.ख. ०-००-४०<br>एकुण ०-०५-७० | २.३४ |

दिनांक : २३/०५/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे गौरकामत ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र. हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मंगेश सुरेश हिंदुराव | १५ | ३ | ०-४१-४० | २=६९ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन मी सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करेन मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत.
हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत

दिनांक :- २३/५/२०२६

खरेदीदार
**वैशाली दौलत ब्राम्हाणे**
म्हाडा कॉलनी कर्जत
ता.कर्जत जि.रायगड
मो. ९८५०२१८२०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकती व घर मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक जयवंत रामदास साळुंखे, रमेश रामदास साळुंखे, चंद्रकांत रामदास साळुंखे, उज्वला पुगावकर यांचेकडून खालील नमुद मिळकतीमधील क्षेत्र निरंतर वहिवाटीच्या रस्त्याचे कराराने हस्तांतरीत करुन घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीता खाली नमूद मिळकतीवरील मालकी हक्कांची तपासणी करणेची आहे. मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चिंचवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १८/३ अ | ००-३५-७० | ८.६२ |
| १८/३ ब | ००-४३-५० | १०.१७ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणा व्यक्ती, आर्थिक संस्था, बँका, भागीदारी संस्था, कंपनी इत्यादी यांचा गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, कुळ हक्क, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा न्यायालयीन वाद, एफ. एस. आय. टी. डी. आर. वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती वरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून तसा दाखला देण्यात येईल आणि माझे अशिल वर नमूद मिळकतीमधील क्षेत्र निरंतर वहिवाटीच्या रस्त्याचे कराराने हस्तांतरीत करुन घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २२/०५/२०२६

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

**पेण येथील मे. तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पेण यांचे कोर्टात**

**कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये**

कु.का.क. ३२ ग दावा क्र.०२/२०२६

कुळ
१. श्री. खंडू आत्माराम म्हात्रे
२. श्री. दिगंबर आत्माराम म्हात्रे
३. श्री. चिंतामण आत्माराम म्हात्रे
४. श्री. अरुण आत्माराम म्हात्रे
५. श्री. केशव आत्माराम म्हात्रे
सर्व रा. कोप्रोली, ता. पेण, जि. रायगड
६. श्रीम. मिना मगन पाटील
रा. कळवे, ता. पेण, जि. रायगड
७. श्रीम. कासुबाई दत्तात्रेय भोईर
रा.जिते, ता. पेण, जि. रायगड
८. श्रीम. मंदाबाई मारुती पाटील (मयत) तर्फे वारस — अर्जदार/वादी
८/१. श्री. प्रकाश मारुती पाटील
८/२. सौ. शितल नितीन पाटील
रा. कळवे, ता. पेण, जि. रायगड
८/३. सौ. सिमा संजय पाटील
रा. पिंपळपाडा पो. कोप्रोली, ता. पेण, जि. रायगड
८/४. सौ. रश्मी रोहन पाटील
रा. कळवे. ता. पेण, जि. रायगड

विरुद्ध

जमिनमालक
१. श्री. भास्कर विश्वेश्वर कर्वे
रा. कोप्रोली ता. पेण, जि. रायगड — सामनेवाला/प्रतिवादी

तमाम जनतेस कळविण्यांत येते आहे की, अर्जदार श्री. खंडू आत्माराम म्हात्रे व इतर १०, रा. कोप्रोली, ता. पेण, जि. रायगड यांनी पेण येथील मे. तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पेण यांच्या कोर्टात खालील वर्णन केलेल्या मिळकतीची कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये खरेदी किमत ठरवून मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे.

जिल्हा व तुकडी रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण तसेच तलाठी सजा उंबर्डे यांचे हद्दीतील अर्जदार यांची मिळकत खाली वर्णन केल्याप्रमाणे आहे.

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट नं./स.नं. | क्षेत्रफळ (हे. आर.) | पोटखराबा (हे. आर.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| कोप्रोली | १११/१/अ/१ | ०-६१-३० | ०-०५-३० | ८.०६ |
| कोप्रोली | ११२/२/इ | ०-०७-३० | ०-०१-५० | ०.८७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे कुळ कायदा कलम ३२ ग खालील दाव्याचे संदर्भात सामनेवाला यांस नोटीसा काढण्यात आलेल्या आहेत. सामनेवाले तसेच अनुसुचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतीस जिथे जिथे ज्यांचा ज्यांचा हितसंबंध असेल त्यांस अर्जदार हे वरील मिळकतीस कुळ असल्याबाबत/नसल्याबाबत हरकत घेण्याची झाल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी हरकत मा. तहसिलदार पेण यांच्यासमोर प्रत्यक्ष हजर राहून अथवा वकिलामार्फत दाखल करावी. दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत दाखल न झाल्यास दाव्याचे कामकाज एकतर्फी घालवून कोर्ट निकाल देऊ शकते. याची समज घ्यावी.

ठिकाण : पेण

दिनांक : १८/०५/२०२६

सही/-
**तानाजी शेजाळ**
तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार
शेतजमीन न्यायाधिकरण पेण

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकती व घर मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक राजेंद्र जगन्नाथ वर्तक, रेणुका वसंत पाटील, कुसुम विलास म्हात्रे, गुलाब सहदेव वर्तक, जगतकुमार सहदेव वर्तक, किर्तीकुमार सहदेव वर्तक, प्रार्थना मनोहर वर्तक, मित मनोहर वर्तक, श्वेता चंद्रकांत चव्हाण, साहिल संजय नाखवा, शिवानी अल्पेश पाटील, वैष्णवी विवेक करडिले, जयश्री अजय ठाकूर, धनश्री मयूर पाटील, राजश्री प्रविण पाटील, वेदांत संतोष मोकल, कमला सतिश म्हात्रे, गंगाधर नामदेव वर्तक, जगदिश नामदेव वर्तक, रमेश नामदेव वर्तक यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीता खाली नमूद मिळकतीवरील मालकी हक्कांची तपासणी करणेची आहे. मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चिंचवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १७/२ | ००-७३-८० | १५.४३ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणा व्यक्ती, आर्थिक संस्था, बँका, भागीदारी संस्था, कंपनी इत्यादी यांचा गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, कुळ हक्क, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा न्यायालयीन वाद, एफ. एस. आय. टी. डी. आर. वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती वरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून तसा दाखला देण्यात येईल आणि माझे अशिल वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २२/०५/२०२६

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. जानू गोविंद दुर्गे, श्रीम. धर्माबाई गोविंद दुर्गे, श्री. नाथा गोविंद दुर्गे व श्री पंढरीनाथ गोविंद दुर्गे सर्व रा. नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४८ | १२ | ०-५८-०० यापैकी विकत द्यावयाचे क्षेत्र ०-२०-०० | ०-५१ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसम, कंपनी, भागीदारी संस्था अथवा अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २३/०५/२०२६

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को. ऑप. हौ.सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

## जाहीर नोटीस

पेण येथील मे. तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पेण यांचे कोर्टात

कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये

कु.का.क. ३२ ग दावा क्र.०१/२०२६

कुळ
१. श्री. खंडू आत्माराम म्हात्रे
२. श्री. दिगंबर आत्माराम म्हात्रे
३. श्री. चिंतामण आत्माराम म्हात्रे
४. श्री. अरुण आत्माराम म्हात्रे
५. श्री. केशव आत्माराम म्हात्रे
सर्व रा. कोप्रोली, ता. पेण, जि. रायगड
६. श्रीम. मिना मगन पाटील
रा. कळवे, ता. पेण, जि. रायगड
७. श्रीम. कासुबाई दत्तात्रेय भोईर — अर्जदार/वादी
रा.जिते, ता. पेण, जि. रायगड
८. श्रीम. मंदाबाई मारुती पाटील (मयत) तर्फे वारस
८/१. श्री. प्रकाश मारुती पाटील
८/२. सौ. शितल नितीन पाटील
रा. कळवे, ता. पेण, जि. रायगड
८/३. सौ. सिमा संजय पाटील
रा. पिंपळपाडा, पो. कोप्रोली, ता. पेण, जि. रायगड
८/४. सौ. रश्मी रोहन पाटील
रा. कळवे, ता. पेण, जि. रायगड

विरुद्ध

जमिनमालक
१. श्रीम. वसुमती विनायक धारकर
२. श्री. शिवराम विनायक धारकर — सामनेवाला/प्रतिवादी
३. श्री. रविंद विनायक धारकर
सर्व रा. कोप्रोली, ता. पेण, जि. रायगड

तमाम जनतेस कळविण्यांत येते आहे की, अर्जदार श्री. खंडू आत्माराम म्हात्रे व इतर १०, रा. कोप्रोली. ता. पेण, जि. रायगड यांनी पेण येथील मे. तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पेण यांच्या कोर्टात खालील वर्णन केलेल्या मिळकतीची कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये खरेदी किंमत ठरवून मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे.

जिल्हा व तुकडी रायगड. पोट तुकडी व तालुका पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण तसेच तलाठी सजा उंबर्डे यांचे हद्दीतील अर्जदार यांची मिळकत खाली वर्णन केल्याप्रमाणे आहे.

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट नं./स.नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | पो.खराबा (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कोप्रोली | १६२/६/ब | ०-०१-३० | ०-००-५० | ०.१२ |
| कोप्रोली | १६३/१/क | ०-१०-४० | ०-००-७० | १.८१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे कुळ कायदा कलम ३२ ग खालील दाव्याचे संदर्भात सामनेवाला यांस नोटीसा काढण्यात आलेल्या आहेत. सामनेवाले तसेच अनुसुचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतीस जिथे जिथे ज्यांचा ज्यांचा हितसंबंध असेल त्यांस अर्जदार हे वरील मिळकतीस कुळ असल्याबाबत/नसल्याबाबत हरकत घेण्याची झाल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी हरकत मा. तहसिलदार पेण यांच्यासमोर प्रत्यक्ष हजर राहून अथवा वकिलामार्फत दाखल करावी. दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत दाखल न झाल्यास दाव्याचे कामकाज एकतर्फी घालवून कोर्ट निकाल देऊ शकते. याची समज घ्यावी.

ठिकाण : पेण

दिनांक : १८/०५/२०२६

सही/-
**तानाजी शेजाळ**
तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार
शेतजमीन न्यायाधिकरण पेण

## विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्ग प्रकल्पाकरीता महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम १९ (ब) अन्वये भूसंपादनाचा मोबदला स्विकारण्याचा विकल्प/पर्याय देणेबाबत जाहिर नोटीस

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमधील तसेच रायगड जिल्ह्यातील वाहतुकीच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्ग प्रकल्पाकरीता खालील तक्त्यात नमूद गावातील जमिनींच्या भूसंपादनाची महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ च्या कलम १५(२) खालील अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात क्रमांक खाक्षेस-२०२०/प्र.क्र.४१७ (पेण)/रस्ते ८ ज्याअर्थी, राज्य शासनाने, शासकीय अधिसूचना, असाधारण क्रमांक ३०४, दिनांक १२/०८/२०२२ व क्रमांक खाक्षेस-२०२०/प्र.क्र.४१७(पेण)/रस्ते ८ ज्याअर्थी, राज्य शासनाने, शासकीय अधिसूचना, असाधारण क्रमांक ४३८, दिनांक १५/१०/२०२४ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त नमूद गावातील अधिसूचित जमिनीच्या बाबतीत उक्त अधिनियमाच्या कलम १९ (ब) अन्वये जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समितीने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २६ ते ३० व अनुसूची-१ अन्वये दि. २५/०२/२०२६ रोजीच्या बैठकीत मोबदला निर्धारीत करून दिला आहे.

त्याअर्थी, जे भूधारक दिलेल्या मुदतीत संमतीपत्र व संमती करारनामा करून देतील व त्याबाबत संपादनाखालील जमीन निर्वेध व निर्जोखमी असल्याची भूसंपादन अधिकारी यांची खात्री पटवुन देतील त्यांना उपरोक्त नमूद अधिनियमातील तरतुदींप्रमाणे निर्धारीत मोबदला रक्कमेवर महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाचे कलम १९(ब)(२) अन्वये अतिरिक्त २५ टक्के वाढीव मोबदला देण्यात येईल. तसेच जे भूधारक दिलेल्या मुदतीत संमतीपत्र व संमती करारनामा करून देणार नाहीत, त्यांना सदरचा अतिरिक्त २५ टक्के वाढीव मोबदला मिळणार नाही व अशा प्रकरणात भूसंपादन अधिकारी यांचेकडून महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाचे कलम १९ ( ब ) (३) अन्वये निवाडा घोषित करून जमीन ताब्यात घेण्यात येईल. सदर संमती व विनासंमती मोबदला रक्कमेच्या तपशीलासहीत विकल्प देण्यासाठीची स्वतंत्ररित्या वैयक्तिक नोटीसा प्राधिकृत भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पेण यांनी निर्गमित केल्या असून, सदर वैयक्तिक नोटीसा हितसंबंधितांनी संबंधित गावांचे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडून प्राप्त करून घ्याव्यात.

तसेच असेही कळविण्यात येते की, नोटीसीत नमूद मोबदल्याबाबत आपली संमती दिनांक ०३/०७/२०२६ पावेतो कार्यालयीन वेळेत प्राधिकृत भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पेण यांचे कार्यालयात सदर नोटीसीत नमूद कागदपत्रांसह तसेच संमतीपत्र व संमती करारनाम्यासह सादर करावी. वरील तारखेपर्यंत संमतीपत्र व संमती करारनामा प्राप्त न झाल्यास आपली संमती नाही असे समजुन अतिरिक्त २५ टक्के वाढीव मोबदल्याशिवाय कलम १९ (ब) (३) अन्वये भूसंपादनाचा निवाडा प्राधिकृत भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पेण यांचेकडून घोषीत करण्यात येईल, याची हितसंबंधितांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव | अ.क्र. | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेण | आंबिवली | ५ | पेण | कोपर |
| २ | | बळवली | ६ | | हमरापूर |
| ३ | | जिते | ७ | | गोविले |
| ४ | | रावे | ८ | | शितोळे |

ठिकाण : पेण

दिनांक : २१/०५/२०२६

सही/-
**(प्रवीण ज्ञानू पवार)**
भूसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी पेण
उपविभाग पेण

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/३४/८३३/२०२६**




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक खर्च टाळावा. गृहसजावटीच्या क्षेत्रात उत्तम संधी लाभतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **वृषभ** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. एकाच वेळी अनेक कामं करावी लागतील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. थोरांचा सहवास लाभेल.
- **कर्क** : मौजमजेकडे विशेष कल राहील. गुंतवणुकीबाबत योग्य सल्ला घ्यावा. छोटा-मोठा प्रवास घडेल.
- **सिंह** : अपेक्षेपेक्षा अधिक प्राप्ती होईल. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. विवाहाची बोलणी सफल होतील.
- **कन्या** : कौटुंबिक समस्या ताण वाढवतील. प्रक्रिया उद्योगात प्रगतीला वाव मिळेल. प्रकृती उत्तम राहील.
- **तूळ** : धार्मिक कार्याचं समाधान लाभेल. खर्च वाढला तरी प्राप्ती अधिक राहील. वाहन सौख्य लाभेल.
- **वृश्चिक** : चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. उद्योगात नवीन गुंतवणूक सध्या नको. प्रकृतीकडे लक्ष द्या.
- **धनु** : व्यवसायात प्रगतीच्या संधी लाभतील. आप्तेष्टांचं सहकार्य लाभेल. चैनीवर अधिक खर्च होईल.
- **मकर** : घरात पाहुण्यांची वर्दळ राहील. भागीदारी व्यवसायात विशेष लक्ष द्यावं. प्रवास शक्यतो टाळावा.
- **कुंभ** : वरिष्ठांकडून दिलासा मिळेल. व्यवसायात विशेष उत्साह राहील. बेरोजगारांना समाधान लाभेल.
- **मीन** : मन विचलित करणाऱ्या घटना संभवतात. विचारानं रहावं. कुलदेवतेची उपासना करायला हवी.

## २३ मे — दिनविशेष

**१९९५** : जावा संगणक भाषेची अधिकृत घोषणा.
**२०१३** : शशिकांत शर्मा यांनी देशाच्या महालेखापालपदाची सूत्रे स्वीकारली.
**२०१५** : जयललिता यांनी पाचव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.
**२०१७** : मँचेस्टरमध्ये बॉंबस्फोटात २२ ठार तर ५९ जखमी. इसिसने जबाबदारी स्वीकारली.
**२०१८** : महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांचे सर्व ग्रंथ डिजिटल स्वरुपात इंटरनेटवर उपलब्ध करुन देण्याचा राज्य सरकारचा निर्णय.

## आरोग्यमंत्र — काय हवं आहारात?

अनेकांना जंक फूडचे विलक्षण प्रेम असते. मात्र आहारात वरचे वर अशा खाद्यघटकांचा समावेश असेल तर आरोग्य धोक्यात येऊ शकतं. हे टाळायचं तर कोणते घटक आहारात हवे याविषयी...

* ब्रोकोली, फ्लॉवर, मटार, पालक यासारख्या भाज्यांमुळे पोट भरलेलं राहील आणि सतत खावंसं वाटणार नाही. लेट्यूस, काकडी, टोमॅटो, कलिंगड, स्ट्रॉबेरी शेक, संत्र्यांचा रस यांचा आहारात समावेश करा. यामुळे तुम्ही ताजेतवाने रहाल. * दिवसभरात वेळोवेळी लिंबूपाणी प्या. यामुळे शरीरातली साखरेची पातळी नियंत्रणात राहील. लिंबूपाण्यात साखर घालून प्या. साखरयुक्त लिंबूपाण्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि थकवा जाणवत नाही. * ऊर्जा मिळवण्यासाठी अंडी खा. अंड्यांमुळे शरीराला 'ड' जीवनसत्त्व आणि प्रथिनं मिळतात. * होल ग्रेन सिरिल्स खा. यामुळे पेशींमध्ये ग्लुकोजची पातळी वाढून तुम्ही उत्साही राहता.* डाएटचा तक्ता तयार करा. यामुळे नियोजनबद्ध आहार घेणं सोपं होऊ शकेल. आहारतज्ज्ञांचा सल्ला घेऊन आहारात चविष्ट पण आरोग्यदायी पदार्थांचा समावेश करा. * शरीराला ग्लुकोजचा पुरवठा व्हायला हवा. उपाशी राहू नका. शरीराला पोषक घटकांपासून वंचित ठेऊ नका. डाएटचा तक्ता तयार केला असेल तर वास्तववादी ध्येय बाळगा. यामुळे वजन आणि एकूणच आरोग्य टिकवून ठेवणं सोपं जाईल. भूक लागली म्हणून काहीही पोटात ढकलू नका. खाण्या-पिण्यावर नियंत्रण ठेवा.




## स्मार्ट टॉक — झटपट करा सर्च

मुलांनो, सध्या प्रत्येक कामात आपल्याला इंटरनेटची मदत लागते. मात्र काही शॉर्टकट्सचा वापर करून सर्चिंगचा वेळ आपण वाचवू शकतो. गुगलवर सर्च करण्याच्या या काही स्मार्ट टिप्स...

* नव्या टॅबमध्ये लिंक पटकन ओपन करण्यासाठी सर्च बारमध्ये लिंक टाईप केल्यानंतर माउसद्वारे कर्सर लिंकवर न्या. लिंक सिलेक्ट करा आणि स्क्रॉल व्हिल लिंक डाउन करून बघा. यामुळे लिंक पटकन ओपन होईल.

* की बोर्डवरच्या कंट्रोल आणि ए या कीज एकत्र दाबून तुम्ही संपूर्ण पेज सिलेक्ट करू शकता. वेब ब्राउजरवर परत जाण्यासाठी ऑल्ट की आणि लेफ्ट ॲरो एकत्र दाबा.

* फाईल्स शोधण्यासाठी विंडोज १० ओएस सिस्टिमवर विंडोज सर्च किंवा कॉर्टानाचा वापर करा. हे स्मार्ट सर्चिंगचे ऑप्शन्स आहेत.

* तुमच्याकडे मॅकबुक असेल तर त्यावर पटकन इमोजी मेनू शोधता येईल. यासाठी कंट्रोल, कमांड आणि स्पेसबार या कीज एकत्र दाबा. यानंतर इमोजीची यादी तुमच्या स्क्रीनवर ओपन होईल.

## स्टाईल स्टेटमेंट — साड्यांचे हटके रंग

* बटरस्कॉच येलो या रंगाची सध्या चलती आहे. पिवळ्या रंगातली ही शेड खूप सुंदर दिसते. या रंगाची फ्लोरल साडी निवडा. पिवळ्या रंगावर फ्लोरल प्रिंट खूप उठून दिसतात. या साडीसोबत गडद रंगाचं ब्लाउज घाला.

* हिरवा रंग आवडत असेल तर मिंट ग्रीन साडीची निवड करा. हा थोडा सौम्य रंग असल्याने त्यावर गडद रंगाचं ब्लाउज शोभून दिसेल. दुसरं म्हणजे हा रंग भाव खाऊन जाईल.

* गडद निळा रंग आता जुना झाला. सध्या चलती आहे ती टरक्वाइश ब्लूची. अत्यंत आल्हाददायक असा हा रंग पाहता क्षणीच डोळ्यात भरतो. सकाळच्या वेळी जॉर्जेटची साडी नेसा. संध्याकाळच्या वेळी ब्रोकेड किंवा सिल्क मटेरियल शोभून दिसेल.

## पंचांग

**शनिवार, २३ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अधिक ज्येष्ठ शु. ८, चंद्रराशी : सिंह, नक्षत्र : मघा, योग : ध्रुव/व्याघात, सूर्योदय ६.०४, सूर्यास्त ७.०७

## फॉरवर्ड्स

**हमारीं फ़ितरत में नहीं उन दरियाओं क़े पिछे चलना...**

**ज़ो समंदर में मिलकर अपनीं पहचान खों देतें हैं...!**

## फॅशन पॅशन

या स्टाईलला थोडं ट्विस्ट देऊन डॅड कॅप्स बाजारात आल्या. बेसबॉल कॅपच्या तुलनेत डॅड कॅपच्या पुढच्या भागाची लांबी थोडी कमी असते. एवढाच काय तो या दोहोंमधला फरक.

फाईव्ह पॅनल ही स्केटर्सची आवडती कॅप आहे. पण ती घालण्यासाठी तुम्ही स्केटर असणं गरजेचं नाही. प्लेन टी शर्ट आणि ट्राउझरवर ती शोभून दिसते. बऱ्याच सेलेब्जना ड्रायव्हर स्टाईल कॅप आवडते. ॲथलेटिक लूकसाठी तुम्ही ट्रकर्स कॅप घालू शकता. आता शॉपिंगला गेल्यावर एखादी ट्रेंडी कॅप नक्की विकत घ्या.

## करिअरवाटा — डेंटिस्ट्रीचा उत्तम पर्याय

सद्यस्थितीत विविध विकारांवर स्वतंत्ररित्या उपचार करणारे दवाखाने बघायला मिळतात. त्यातीलच एक म्हणजे दंतविकारांवर उपचार करणारी डेंटल क्लिनिक. मात्र अनेक ठिकाणी ही क्लिनिक हव्या त्या संख्येने उपलब्ध नाहीत. अशी स्थिती असताना दुसऱ्या बाजूला दंतवैद्यक महाविद्यालयातील जागा रिकाम्या असल्याचं चित्र समोर येतं. बरेचदा एमबीबीएसला प्रवेश मिळत नाही म्हणून नाईलाजाने काही विद्यार्थी दंतवैद्यक शास्त्राकडे वळतात. म्हणजे अनेक विद्यार्थी दंतवैद्यक शाखेमध्ये करिअर करायचं असं ठरवून इकडे येत नाहीत. मात्र तसं ठरवलंच आणि दंतवैद्यक शास्त्र हेच आपलं करिअर असेल असं निश्चित केलं तर इथे भरपूर संधी आहेत आणि या करिअरला समाजात मानही आहे हे लक्षात घ्यायला हवं. दंतवैद्यक शास्त्रामध्ये केवळ पदवी घेऊन फारसं काम करता येईल असं नाही. मात्र पदव्युत्तर पदवी घेतली तर मात्र इथे चांगलं करिअर करता येतं. त्यामुळे वैद्यकीय शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी डेंटिस्ट्री हा नाईलाज म्हणून स्वीकारण्याजोगा पर्याय न मानता करिअर म्हणून त्याकडे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. या उत्तम संधीचा अवश्य विचार करायला हवा.



## खेचाखेची — वायरवर कपडे

**गुरुजी** – सांगा बरं, भारतात इलेक्ट्रिक वायर्स एवढ्या उंचीवर का असतात ?

.
.
.
.

**गण्या** – कारण भारतातील बायका त्यावर पण कपडे वाळत घालायला कमी करणार नाहीत.

## वेगळं काही

बेलारूसमध्ये वैद्यकीय पर्यटनाचं प्रमाण बरंच आहे. इथे मिठाच्या खाणींचं रुपांतर स्पामध्ये करण्यात आलं आहे. हे अनोखे स्पा लोकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत आहेत. जमिनीपासून ४०० मीटर खोल हे स्पा आहेत. या स्पामध्ये उपचार करून घेण्यासाठी दरवर्षी काही हजार पर्यटक बेलारूसला येतात. बेलारूसमधल्या खाणी तसंच बोगद्यांमध्ये मीठ आणि पोर्टॅशियम मोठ्या प्रमाणावर आढळतं. याचा उपयोग विविध विकारांवरच्या उपचारांसाठी केला जातो. इथे येणाऱ्या लोकांना मन:शांती तर मिळतेच शिवाय अस्थमा, ॲलर्जी आणि श्वसनाचे विकारही दूर होतात. राजधानी मिन्स्कपासून १३० किलोमीटर अंतरावर १९९१ मध्ये पहिलं नॅशनल स्पीलिओथेरेपी क्लिनिक सुरू झालं.

## फॅशन पॅशन — वापर पर्यावरणरक्षक प्रावरणांचा

सध्या ऑर्गेनिक हा परवलीचा शब्द झाला आहे. आहारात ऑर्गेनिक घटकांच्या समावेशाबरोबरच फॅशनविश्वातही ऑर्गेनिक फॅशनचा बोलबाला दिसून येत आहे. या फॅशनमध्ये कार्बनिक कॉटन, बांबू फॅब्रिक, हातमागावर विणलेलं फॅब्रिक आदींचा समावेश होतो. धागे रंगवण्यासाठी वापरलेले रंगही नैसर्गिक पद्धतीने तयार केलेले असल्यामुळे त्वचेला कोणत्याही प्रकारे हानी पोहचत नाही. याविषयी...

* सध्या पर्यावरण रक्षणासाठी विविध उपाय योजले जात आहेत. अशा वेळी ऑर्गेनिक रंगांचा प्रयोग करून टेक्सटाईल इंडस्ट्रीतील प्रदुषणाला आळा घालणं शक्य आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षण आणि त्वचेचं आरोग्य जपणं हे दोन्ही हेतू साध्य होतील. * ऑर्गेनिक पद्धतीने कापड विणताना नैसर्गिक तत्वांचा वापर केला जातो. सहाजिकच या कपड्यांमुळे प्रदूषणाचा धोका टळतो. * ऑर्गेनिक फॅशन इंडस्ट्री विस्तारत आहे. त्यामुळे आर्थिक विकासालाही हातभार लागत आहे. * ऑर्गेनिक पद्धतीने कापड बनवण्याची प्रक्रिया क्लिष्ट असते. त्यामुळे या कपड्यांच्या किमती जास्त असतात. पण त्यांचा वापर आरोग्यदायी ठरतो हे लक्षात ठेवावं आणि त्यांचा वापर करावा.



## सुडोकू १०७


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | ९ | १ | | | | | २ |
| | ७ | | | ५ | | | | ६ |
| | ६ | | ३ | | | | १ | ५ |
| | | | | | ९ | | २ | ४ |
| ९ | | ५ | | ४ | | १ | | ७ |
| ८ | ४ | | ५ | | | | | |
| ६ | ९ | | | | ८ | | ५ | |
| ४ | | | | ३ | | | ६ | |
| ७ | | | | | ६ | ४ | | ९ |

**टीप** -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १०६चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३ | ७ | १ | ६ | ४ | २ | ९ | ५ |
| ५ | ९ | २ | ७ | ८ | ३ | ६ | ४ | १ |
| १ | ४ | ६ | ५ | ९ | २ | ७ | ३ | ८ |
| ९ | ७ | ३ | ८ | ४ | ५ | १ | ६ | २ |
| ६ | ५ | १ | ९ | २ | ७ | ३ | ८ | ४ |
| ४ | २ | ८ | ६ | ३ | १ | ९ | ५ | ७ |
| ३ | ६ | ५ | २ | ७ | ८ | ४ | १ | ९ |
| २ | ८ | ४ | ३ | १ | ९ | ५ | ७ | ६ |
| ७ | १ | ९ | ४ | ५ | ६ | ८ | २ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १०७




**आडवे शब्द :-**
१) रमा
२) भारवाहक
४) बाळाला झोपविताना म्हणण्याचा गीत प्रकार
८) पुष्पदल
१०) त्रेधा,गोंधळ
१२) जळफळाट,अरेरावी
१४) रचना करणारा
१७) कलाबूत
१८) ज्याला बोलता येत नाही असा
१९) तांबडा
२१) चंदन उगाळण्याचा दगड
२३) जेवणे,पोट भरणे
२५) नीच,दुष्ट
२९) राजाची पत्नी
३०) आवाज,गोंगाट
३१) भांडण
३२) प्राणन्तिक वेदना
३५) लेखणी
३६) दिवस
३७) जाडेभरडे सुती कापड प्रकार
३८) नवरदेव
३९) किंमत
४०) जास्तीत जास्त
४२) मॅचला मराठी शब्द
४४) वाऱ्याने हलणाऱ्या झाडांच्या पानांचा आवाज
४७) न वापरलेला,नूतन
४९) हलणारे,अस्थिर
५०) मध्यस्थ
५१) धाकटा
५३) काळजी,भयंकर
५४) संगीतातील एक राग
५७) प्रफुल्लित
६१) जिवलग मित्र
६३) मोजकेपणा
६५) भ्रमर
६७) अरण्य
६८) मेंढपाळ
७०) संध्याकाळ
७१) धनको
७२) प्रज्वलित,तापलेले
७५) बारीक,मऊ केस
७७) वाद्य वाजविणे
७८) हिंदीत शपथ
७९) फिकीर
८०) उपवासाचे तांदूळ

**उभे शब्द :-**
१) उत्कर्षाचा काळ
२) वजनाला कमी असलेला
३) वेल
४) आकाश
५) शिल्लक राहिलेला ओला कचरा
६) कवी
७) अंधार
८) त्वचारोग
९) कशासाठी
११) डेरा
१३) चोर
१५) नेता,चित्रपटातील प्रमुख अभिनेता
१६) फळातील द्रव
१८) स्वयंपाकघर
२०) लसूणाची पाकळी
२२) परिस्थिती
२३) वांग्याचा चमचमीत पदार्थ
२६) त्वरित
२७) रायगड्यावरील एक कडा
२८) खसखस लावलेला एक गोड पदार्थ
२९) रसाचा गावठी आंबा
३३) सूची
३४) श्रीफळ
३९) खाचखळग्याची जमीन
४१) हत्तीचा शिक्षक
४३) टप्पे घेत घेत केलेला प्रवास
४४) मध्यम प्रमाण
४५) संतोष, आनंद
४६) ** ** स्वाहा,मांत्रिकाचा एक शब्द
४८) स्वत:ला
५०) प्रत्येक दिवशी
५२) दर्भासन
५५) छोटासा
५६) शरीर
५८) वागणूक
५९) नवरसातील शौर्याचा रस
६०) दालचिनी
६२) खानदान
६४) लाकूड छिलण्याचे हत्यार
६६) बारीक झणझण
६७) प्रत्यक्ष कृती
६८) हिंमत,धैर्य
६९) उष्ण
७३) पौराणिका अश्ववाहन
७४) बारा वर्षाचा काळ
७६) व्रत

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

## अनन्याचा ग्लॅमरस प्रवास




२०१९ मध्ये 'स्टुडंट ऑफ द इयर २' मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या अनन्या पांडेने अत्यंत कमी वेळात हिंदी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ज्येष्ठ अभिनेते चंकी पांडे यांची मुलगी असल्यामुळे करिअरच्या सुरुवातीला तिला 'नेपोटीझम' आणि 'स्टारकिड' या शिक्क्याचा मोठा सामना करावा लागला. मात्र, अनन्याने या टीकेला उत्तर न देता आपल्या कामावर लक्ष केंद्रित केले. 'पती पत्नी और वो', 'खाली पीली' आणि 'गेहराईया'सारख्या वेगवेगळ्या जॉनरच्या चित्रपटांमधून तिने आपल्या अभिनयातील वैविध्य सिद्ध केले. विशेषतः 'खो गये हम कहाँ' मधील तिच्या डिजिटल युगातील तरुणीच्या भूमिकेचे समीक्षकांनी भरभरून कौतुक केले. या चित्रपटामुळे तिची एक प्रगल्भ आणि संवेदनशील अभिनेत्री म्हणून नवी ओळख तयार झाली.

विवेक सोनी यांच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेल्या 'चाँद मेरा दिल' या चित्रपटात अनन्या एका प्रचंड भावनेने भारलेल्या भूमिकेत चमकत आहे. नुकतीच या चित्रपटातील एका महत्त्वाच्या भावनिक दृष्याची चर्चा सोशल मीडियापासून ते सिनेसृष्टीत बरीच रंगली आहे. हे दृष्य पडद्यावर केवळ शारीरिक आकर्षण दाखवणारे नसून, दोन पात्रांमधील खोल भावनिक गुंतवणूक आणि नाते व्यक्त करणारे आहे.

या कठीण दृष्यावर आणि अनन्याच्या परफॉर्मन्सवर प्रतिक्रिया देताना तिचा सहकलाकार लक्ष्य लालवानी म्हणाला, अनन्याने हा सीन इतक्या नैसर्गिकरीत्या आणि समजूतदारपणे साकारला की, सेटवर उपस्थित असलेले सर्वजण थक्क झाले. तिच्यातील कमालीची व्यावसायिक वृत्ती आणि पात्राची समज यामुळेच अशा कठीण दृष्याचे चित्रीकरण अतिशय सोपे झाले.

१९७०-८० च्या दशकातील जुन्या रोमँटिक धाटणीचा लूक आणि अनन्याचा स्क्रीनवरील प्रभावी वावर प्रेक्षकांना नक्कीच भुरळ घालेल, अशी चर्चा आतापासूनच सुरू झाली आहे. सुरुवातीच्या काळात केवळ एक क्युट आणि ग्लॅमरस मुलगी म्हणून ओळखली जाणारी अनन्या आता गंभीर आणि आव्हानात्मक भूमिका लिलया पेलत आहे.

## रणदीपचा कडक अंदाज!



उत्तर प्रदेशमधील गुन्हेगारीचा सुफडा साफ करायला इन्स्पेक्टर अविनाश परतलाय. खऱ्याखुऱ्या घटनांवर आधारित हा जबरदस्त थरार अनुभवायला तयार रहायला हवं. रणदीप हुड्डाचा कडक रांगडा अंदाज आणि गुन्हेगारीचा खात्मा करणारी 'इन्स्पेक्टर अविनाश २' ही बहुप्रतिक्षित वेब सीरिज अखेर २० मे २०२६ रोजी जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित झाली आहे. नीरज पाठक यांच्या दिग्दर्शनाखाली आणि निर्मितीखाली साकारलेल्या या सीझनमध्ये रणदीप हुड्डासोबत उर्वशी रौतेला, अमित सियल आणि अभिमन्यू सिंग यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. या सीरिजचे चित्रीकरण उत्तर प्रदेशमधील लखनऊ, रायबरेली आणि वाराणसी येथील वास्तविक लोकेशन्सवर करण्यात आले आहे. त्यामुळे कथेला एक वेगळीच धार आली आहे. चित्रीकरणादरम्यान अनेक थरारक आणि तितकेच विनोदी किस्से घडले. एका चकमकीच्या दृश्यावेळी रणदीपने डमी न वापरता स्वतः साहसी स्टंट्स केले. त्यामुळे क्रूचे डोळे विस्फारले होते. विशेष म्हणजे, भर उन्हात युपीच्या गल्ल्यांमध्ये धावपळीचे चित्रीकरण करताना रणदीपने स्थानिक पोलिसांच्या शैलीतच सहकाऱ्यांची फिरकी घेतली. त्यामुळे गंभीर वातावरणातही हास्याची लहर पसरायची. रणदीपच्या जबरदस्त डायलॉग डिलिव्हरीमुळे सेटवर अनेकदा टाळ्यांचा कडकडाट व्हायचा. थरार, ॲक्शन आणि अस्सल गावरान संवादांनी नटलेला हा सीझन प्रेक्षकांसाठी एक मोठी मेजवानी ठरत आहे.

## उत्कंठावर्धक न्यायालयीन थरारपट



न्यायालयीन लढाई आणि सत्य शोधणारा 'सिस्टीम' हा एक नवा प्रवास लवकरच सुरू होत आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना एका थरारक अनुभवाची प्रचिती देईल. अमित कुमार दिग्दर्शित आणि क्रिएटिव्ह माइंड्स प्रॉडक्शन निर्मित चित्रपट प्रेक्षकांना एका उत्कंठावर्धक न्यायालयीन थराराचा अनुभव देणार आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेत मनोज बाजपेयी एका खंबीर वकिलाच्या रूपात, तर प्राजक्ता कोळी एका धाडसी पत्रकाराच्या भूमिकेत दिसणार असून त्यांना आशुतोष राणा आणि सुप्रिया पाठक या कसलेल्या सहकलाकारांची भक्कम साथ लाभली आहे. दिल्लीचे सर्वोच्च न्यायालय ऐतिहासिक पटियाला हाऊस कोर्ट परिसर आणि जुन्या दिल्लीच्या गजबजलेल्या खऱ्याखुऱ्या ठिकाणांवर या चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले आहे. चित्रीकरणादरम्यान कडाक्याच्या थंडीत रात्रीच्या वेळी एका गंभीर कोर्ट सीनचे चित्रीकरण सुरू असताना, अचानक एक पाळीव कुत्रा थेट सेटवर घुसला आणि न्यायाधीशांच्या खुर्चीवर जाऊन बसला. या अनपेक्षित आणि मजेशीर प्रसंगामुळे सेटवरील कमालीचे गंभीर वातावरण एका क्षणात हास्यकल्लोळात बदलले. सत्य आणि न्याय याभोवती फिरणारी ही कथा २२ मे २०२६ पासून ॲमेझॉन प्राईम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे.

## नवा संच, तोच जोश!




खूप दिवसांनी तीच मजा आणि तोच राडा अनुभवायला मिळणार आहे, कारण पुन्हा एकदा धिंगाणा घालायला जुनी गँग येतेय. मराठी रंगभूमीवर इतिहास घडवणारे देवेंद्र पेम यांचे 'ऑल द बेस्ट' हे नाटक एका प्रदीर्घ काळानंतर नवीन संचात पुन्हा रंगभूमीवर पाय ठेवत आहे. या नव्या इनिंगचे दिमाखदार प्रयोग २३ आणि २४ मे रोजी बोरीवली आणि मुंबईतील विविध नाट्यगृहांमध्ये पार पडणार आहेत. या नाटकाच्या निर्मितीची आणि दिग्दर्शनाची धुरा स्वतः देवेंद्र पेम सांभाळत असून अभिनयामध्ये मयुरेश पेम आणि निखिल चव्हाण ही जोडी मुख्य भूमिकेत धुमाकूळ घालणार आहे. नाटकाच्या तालमीदरम्यान कलाकारांमध्ये कमालीचे बाँडींग पहायला मिळाले. विशेषतः पात्रांच्या शारीरिक व्यंगाचा सराव करताना अनेकदा मयुरेश आणि निखिलचा तोल जाऊन मंचावरच पडझड व्हायची, पण त्यातूनच विनोदी प्रसंगांची निर्मिती झाली. रंगीत तालमीच्या वेळी संवादांची अदलाबदल झाल्यामुळे झालेला गोंधळ आणि एकमेकांची खेचत चाललेली मस्ती यामुळे तालमीचे वातावरण नेहमीच करमणुकीचे राहिले. तांत्रिक अडथळ्यांवर मात करत आणि नवनवीन प्रयोग करत या संचाने नाटकाला आधुनिक साज चढवला आहे, जो प्रेक्षकांसाठी नक्कीच पर्वणी ठरेल.

## कर्तव्य आणि संघर्षाची थरारकथा



कर्तव्य आणि धर्माच्या दुविधेत अडकलेल्या एका प्रामाणिक पोलीस अधिकाऱ्याची खिळवून ठेवणारी गुन्हेगारी विश्वातील सत्यकथा नेटफ्लिक्सवर चर्चेत आहे. गौरी खान यांच्या रेड चिलीज एंटरटेनमेंटने निर्मिलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन 'भक्षक' फेम पुलकीत यांनी केले आहे. यात सैफ अली खान एका प्रामाणिक पोलीस अधिकाऱ्याच्या (पवन मलिक) भूमिकेत असून त्यांच्यासोबत रसिका दुग्गल, संजय मिश्रा, जाकिर हुसेन आणि मनीष चौधरी यांसारख्या दिग्गज कलाकारांची फौज आहे. या सीरिजचे चित्रीकरण प्रामुख्याने उत्तर भारतातील रोहतक आणि लखनौच्या गजबजलेल्या भागात झाले आहे. चित्रीकरणादरम्यानचा एक रंजक किस्सा म्हणजे खुद्द शाहरुख खानने सैफला या भूमिकेसाठी सुचवले होते. सेटवर सैफच्या धमाल स्वभावामुळे गंभीर दृश्यांच्या वेळीही वातावरण हलकंफुलकं राहायचं. एका साहसी दृश्याच्या वेळी सैफने स्वतः अनेक स्टंट्स यशस्वीरीत्या पूर्ण केले. धर्म करतो तर कर्म सुटते आणि कर्म करतो तर धर्म, अशा दुविधेत अडकलेल्या एका पोलिसाची ही कथा प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी आहे.

## सत्याचा शोध, संघर्षाचा नवा प्रवास!



पहिल्या भागाच्या प्रचंड यशानंतर आता 'द केरला स्टोरी २'चा पुढचा अध्याय प्रेक्षकांच्या समोर येत आहे. समाजातील एका गंभीर आणि संवेदनशील विषयावर प्रकाश टाकणारा हा प्रवास नक्कीच विचार करायला लावणारा आहे. अदा शर्मा स्टारर आणि वादग्रस्त विषयामुळे चर्चेत राहिलेल्या 'द केरला स्टोरी'चा दुसरा भाग म्हणजेच 'द केरला स्टोरी २' हा चित्रपट झी ५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाची निर्मिती विपुल अमृतलाल शहा यांनी केली असून दिग्दर्शनाची धुरा पुन्हा एकदा सुदीप्तो सेन यांनी सांभाळली आहे. चित्रपटाचे मुख्य चित्रीकरण केरळच्या अंतर्गत भागांमध्ये आणि परदेशातील दुर्गम लोकेशन्सवर पार पडले आहे.

चित्रीकरणादरम्यान अनेक साहसी आणि आव्हानात्मक प्रसंग घडले. विशेषतः जंगलातील दृश्यांचे चित्रीकरण करताना तांत्रिक पथकाला नैसर्गिक अडथळ्यांचा सामना करावा लागला. त्यामुळे कलाकारांना अनेक तास पावसात ताटकळत रहावे लागले. पण या गंभीर वातावरणातही अदा शर्मा सेटवर सतत जोक्स सांगून सहकलाकारांचे मनोरंजन करायची. एकदा एका गंभीर दृष्याच्या चित्रिकरणप्रसंगी अचानक स्थानिक प्राण्यांचा वावर वाढल्याने शूटिंग थांबवावे लागले. त्यामुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र नंतर परिस्थिती निवळल्यावर संपूर्ण क्रूने हसून दाद दिली. सत्यघटनांवर आधारित या चित्रपटाने पुन्हा एकदा प्रेक्षकांमध्ये कुतूहल निर्माण केले आहे.

## फुटबॉलचा थरार, चॅम्पियन्सचा वार!



फुटबॉल विश्वातील सर्वात मानाची स्पर्धा यूईएफए चॅम्पियन्स लीग अंतिम टप्प्यात आली असून याचे थेट प्रक्षेपण मे महिन्यात सोनी लिव्ह वाहिनीवर सुरू आहे. या स्पर्धेचा हाय-व्होल्टेज अंतिम सामना ३० मे २०२६ रोजी जर्मनीच्या म्युनिकमधील ऐतिहासिक अलायन्झ एरिना स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या भव्य सोहळ्याचे तांत्रिक नियोजन आणि कव्हरेज युएफाच्या विशेष प्रॉडक्शन टीमद्वारे केले जाते, तर थेट प्रक्षेपणाचे दिग्दर्शन जागतिक दर्जाचे क्रीडा दिग्दर्शक करतात. या स्पर्धेचे मुख्य सामने लंडन, माद्रिद, पॅरिस आणि म्युनिकसारख्या मोठ्या शहरांमधील नामांकित मैदानांवर पार पडले आहेत. या हंगामात मैदानावर अनेक साहसी आणि थरारक गोल पहायला मिळाले, पण मैदानाबाहेरही काही मनोरंजक किस्से घडले. एका उपांत्यपूर्व सामन्यादरम्यान, सरावावेळी खेळाडूंची मस्करी सुरू असताना चेंडू थेट समालोचकांच्या बॉक्समध्ये जाऊन पडला. त्यामुळे प्रक्षेपणाप्रसंगी एकच हशा पिकला. तसेच, एका सामन्यात कडक सुरक्षा व्यवस्था असूनही एका चाहत्याने मैदानात धाव घेत आपल्या आवडत्या खेळाडूला मिठी मारली. त्यामुळे सुरक्षारक्षकांची चांगलीच धावपळ झाली. खेळाडूंचा वेगवान खेळ आणि चाहत्यांचा जल्लोष यामुळे ही लीग यंदा अधिकच रंगतदार ठरली आहे. या सीरिजच्या निमित्ताने जगभरातील फुटबॉल चाहत्यांची उत्कंठा शिगेला पोहोचली असून मैदानावर आता फक्त महामुकाबला पहायला मिळणार आहे. घरबसल्या या जागतिक स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी सोनी लिव्ह सज्ज झाले आहे.

## भक्ती आणि विज्ञानाचा पुढचा अध्याय




'देऊळबंद २'च्या निमित्ताने विज्ञानाच्या कसोटीवर भक्तीचा नवा कस लागणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील मैलाचा दगड ठरलेल्या 'देऊळबंद'नंतर आता २० मे २०२६ रोजी त्याचा बहुप्रतीक्षित 'देऊळबंद २' हा सिक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. पॅनोरमा स्टुडिओज आणि व्हॉट्स अप मीडिया निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रविण तरडे आणि प्रणित कुलकर्णी या जोडगोळीने केले आहे. चित्रपटात गश्मीर महाजनी मुख्य भूमिकेत असून त्यांच्यासोबत मोहन जोशी (स्वामी समर्थांच्या भूमिकेत), प्रसाद ओक आणि गिरीश कुलकर्णी यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. चित्रपटाचे चित्रीकरण अक्कलकोट, पुण्यातील ऐतिहासिक वाडे आणि कोकणातील निसर्गरम्य परिसरात झाले आहे. चित्रीकरणादरम्यान अनेक मनोरंजक किस्से घडले; विशेषतः एका कठीण साहसी दृश्यावेळी अचानक पावसाची रिपरिप सुरू झाली, पण संपूर्ण टीमने स्वामी समर्थांच्या जयघोषात ते चित्रीकरण पूर्ण केले. सर्वजण याला स्वामींचा आशीर्वाद मानतात.

## हळव्या प्रेमाची गाथा



१९७०-८० च्या दशकातील भूतकाळातील आठवणींना उजाळा देणारी आणि प्रेम, भक्ती व आत्मसन्मानाचा अनोखा संघर्ष मांडणारी एक हळवी प्रेमभेट 'चाँद मेरा दिल'च्या निमित्ताने पहायला मिळत आहे. बॉलिवूडमधील चुलबुली अभिनेत्री अनन्या पांडे आणि 'किल' फेम अभिनेता लक्ष्य लालवानी यांची मुख्य भूमिका असलेला 'चाँद मेरा दिल' मोठ्या पडद्यावर झळकत आहे. धर्मा प्रोडक्शन्स (करण जोहर, अपूर्वा मेहता आणि अदार पूनावाला) निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन विवेक सोनी यांनी केले आहे. या चित्रपटाचे बहुतांश चित्रीकरण पुण्यातील फ्लेम युनिव्हर्सिटी आणि हैदराबादमधील चारमिनार परिसरात झाले आहे. चित्रीकरणादरम्यान अनेक मनोरंजक किस्से घडले; पुण्याच्या कॅम्पसमध्ये अनन्या एका सीनसाठी नवरीच्या वेषात चक्क जिममध्ये अभ्यास करताना दिसली, ज्याची सोशल मीडियावर खूप चर्चा झाली. तसेच, हैदराबादमध्ये पावसाच्या रिमझिमत्या सरींमध्ये अनन्या आणि लक्ष्य यांचा लाल रंगाच्या पोशाखातील बाईक राईडचा सीन चाहत्यांसाठी विशेष आकर्षण ठरला. भक्ती, प्रेम आणि आत्मसन्मान यांचा संघर्ष मांडणारा हा चित्रपट प्रेक्षकांना जुन्या आठवणींमध्ये घेऊन जाणारा सांगितीक प्रवास ठरेल.

# नसांचा रंग कसा?



**त्व**चेखाली फुगलेल्या नसा पाहतो तेव्हा त्या निळ्या किंवा हिरव्या रंगाच्या दिसतात. पण रक्ताचा रंग तर लाल असतो. मग रक्तवाहिन्या निळ्या किंवा हिरव्या का दिसतात? असा प्रश्न तुम्हाला कधी पडतो का?

मुलांनो, आपल्या रक्तात हिमोग्लोबिन नावाचे एक प्रथिन असते, जे शरीराच्या प्रत्येक भागात ऑक्सिजन पोहोचवण्याचे काम करते. हे हिमोग्लोबिन ऑक्सिजनशी संयोग पावते तेव्हा ते चमकदार लाल होते. रक्त आपल्या शरीरात वाहते. त्वचेवर प्रकाश पडतो तेव्हा तो वेगवेगळ्या रंगांमध्ये विभागला जातो. लाल रंगाची तरंगलांबी जास्त असते आणि ती त्वचेत खोलवर जाऊ शकते. निळ्या लाटा कमी खोलीपर्यंत प्रवास करतात आणि लवकर परावर्तित होतात. यामुळे, आपले डोळे बहुतेक निळ्या लाटा टिपतात आणि आपल्याला शिरा निळ्या किंवा हिरव्या दिसतात. म्हणजेच डोळे आणि मेंदू एकत्रितपणे आपल्याला दाखवतात ते रंग वास्तविक असतातच असे नाही. नसांच्या पृष्ठभागावरून

**माहिती असू द्या**

परावर्तित होणारा प्रकाश आणि त्वचेखालील पोत एकत्रितपणे एक भ्रम निर्माण करतात ज्यामुळे त्या निळ्या दिसतात.

अनेकांना असे वाटते की, ऑक्सिजनची कमतरता असलेले रक्त असल्यास नसांचा रंग निळा असतो. तथापि, हे खरे नाही. गोरी त्वचा असलेल्या लोकांमध्ये शिरा बहुतेकदा अधिक स्पष्ट आणि निळ्या/हिरव्या दिसतात तर गडद त्वचेमध्ये हा फरक कमी लक्षात येतो. त्वचेची जाडी, रंग आणि नसांची

# आहार हवा जीवनसत्त्वांनी युक्त




**श**रीराप्रमाणे मन निरोगी ठेवणे गरजेचे असते. अर्थातच त्यासाठी काही जीवनसत्त्वांची आवश्यकता असते. त्यांची कमतरता असेल तर आपल्या मानसिक आरोग्यावर विपरित परिणाम होतो. मानसिक संतुलन बिघडू शकते. म्हणूनच मेंदूला बळकटी देण्यासाठी आहारात खालील जीवनसत्त्वांनी युक्त घटकांचा समावेश आवर्जून करायला हवा.

✻ व्हिटॅमिन बी १२ मेंदूला योग्यरित्या कार्य करण्यास मदत करते. त्याच्या कमतरतेमुळे स्मरणशक्ती कमी होणे, चक्कर येणे, गोंधळणे, चिडचिड आणि नैराश्य यासारख्या समस्या उद्भवू शकतात. थकवा जाणवणे, लक्ष केंद्रित करण्यात अडचण येणे, गोष्टी विसरणे ही त्याची काही प्रमुख लक्षणे आहेत. म्हणूनच आपण आहारात दूध, दही, अंडी, मांस, मासे आणि फोर्टिफाइड तृणधान्यांचा वापर करायला हवा. याचे कारण त्याचमध्ये व्हिटॅमिन बी १२ भरपूर प्रमाणात आढळते. शाकाहारी असाल तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तुम्ही सोया मिल्क, मशरूम, फोर्टिफाइड ब्रेड किंवा सप्लिमेंट्स घेऊ शकता.

✻ व्हिटॅमिन डी फक्त हाडे निरोगी ठेवते असे नाही तर ते मेंदूचा मूड सेंटरही नियंत्रित करते. याच्या कमतरतेमुळे नैराश्य, चिंता आणि थकवा यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्याची

**आहारज्ञान**

कमतरता उदास मनःस्थिती, अस्वस्थता आणि झोपेची कमतरता याद्वारे ओळखली जाऊ शकते. म्हणूनच धोका टाळण्यासाठी व्हिटॅमिन डी युक्त घटकांचा आहारात समावेश करायला हवा.

✻ व्हिटॅमिन बी ६ मेंदूतील न्यूरोट्रांसमीटर (जसे की सेरोटोनिन आणि डोपामाइन) संतुलित करण्यास मदत करते.

# प्राणीविश्वातील भ्रमंती



**तु**म्ही सुटीत खूप धमाल करत असाल. शक्य असेल तर तुम्ही जंगलसफारीला जा. प्राण्यांच्या दुनियेची सफर करा. मित्रमैत्रिणींनो, जंगलसफारी खूप थ्रीलिंग असते. तुम्हाला इथे भरपूर प्राणी बघता येतील. जंगल म्हणजे प्राण्यांच घर. त्यामुळे वाघ, सिंहासारखे प्राणी तेथे मुक्तपणे हिंडत असतात. म्हणूनच जंगलात फिरायला जायचं तर काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. काही नियमांचं पालन करायला हवं. जंगल सफारीची योजना आखत असाल तर काय करायला हवं याविषयी...

✻ जंगलात फिरायला गेल्यावर आरडाओरडा करू नका. यामुळे प्राणी घाबरतात, लपून बसतात. त्यामुळे फिरताना शांतता राखा.

✻ जंगलात फिरायला जाताना कपड्यांकडे लक्ष द्या. गडद रंगाचे कपडे घालणं टाळा. निसर्गाशी साधर्म्य साधणाऱ्या रंगांचे कपडे घाला.

✻ जंगलात फिरताना गाडीतून अजिबात उतरू नका. हात बाहेर काढू नका. कोणत्याही प्राण्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करू नका.

✻ जंगलात कचरा करू नका. प्लास्टिक पिशव्या, बाटल्या फेकू नका.

✻ प्राण्यांची वास घेण्याची क्षमता माणसांपेक्षा जास्त असते. त्यामुळे फार परफ्युम लावू नका.

✻ फोटो काढताना फ्लॅशचा वापर करू नका. फ्लॅशमुळे

**भटकंती**


प्राण्यांना त्रास होऊ शकतो.

✻ जंगलात गेल्यावर प्राण्यांना त्रास देऊ नका. तुम्ही त्यांच्या राज्यात आला आहात हे लक्षात ठेवा.

# कंकणाकृती सूर्यग्रहण



**कं**कणाकृती सूर्यग्रहण हा निसर्गातील एक विलक्षण आणि सुंदर प्रकार आहे. यात चंद्र सूर्याच्या अगदी समोर येतो, पण तो सूर्याला पूर्ण झाकत नाही. त्यामुळे सूर्याभोवती आगीच्या वलयासारखी तेजस्वी कडा दिसते. त्यामुळे ते आकाशात



चमकणारे कंकण वाटते. म्हणून याला कंकणाकृती सूर्यग्रहण म्हणतात. चंद्र पृथ्वीभोवती अंडाकृती कक्षेत फिरतो. फिरत असताना तो पृथ्वीपासून थोडा दूर असतो. त्या वेळी तो

**रंजक विज्ञान**

आपल्याला लहान दिसतो. अशा वेळी चंद्र सूर्याच्या समोर आला, तर तो सूर्याला पूर्णपणे झाकू शकत नाही. त्यामुळे त्याची बाहेरची कडा दिसत राहते. परिणामी कंकणाकृती ग्रहण तयार होते.

इतिहासात सूर्यग्रहणांचे निरीक्षण खूप जुने आहे. प्राचीन चीन आणि बॅबिलोनिया येथे लोकांनी हजारो वर्षांपूर्वी ग्रहणांची नोंद ठेवली. सुमारे इ.स.पूर्व २१३७ मधील एक सूर्यग्रहण ही पहिल्या नोंदींपैकी मानली जाते. त्या काळी लोकांना ग्रहण म्हणजे देवांचा राग किंवा अपशकुन वाटत असे. पुढे विज्ञानाने त्यामागचे खरे कारण समजावून सांगितले.

कंकणाकृती सूर्यग्रहण क्वचितच दिसते. पृथ्वीवर एकाच ठिकाणी ते खूप वर्षांनी दिसते. कारण त्याचा मार्ग खूप अरुंद असतो. त्यामुळे जगात कुठे ना कुठे ते घडत असले, तरी आपल्याला ते पाहायला मिळणे हे विशेष असते.

अलीकडच्या काळात १४ ऑक्टोबर २०२३ रोजी अमेरिकेच्या काही भागात कंकणाकृती सूर्यग्रहण दिसले होते. पुढील काही वर्षांमध्ये म्हणजे २०२६ ते २०२८ दरम्यान वेगवेगळ्या भागांमध्ये दिसणार आहे. पण प्रत्येक वेळी ते भारतात दिसेलच असे नाही.

सूर्यग्रहणामुळे शास्त्रज्ञांना खूप महत्त्वाची माहिती मिळते. सूर्याच्या बाहेरील थरांचा अभ्यास, प्रकाशाचे वर्तन, पृथ्वीच्या वातावरणावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करता येतो. प्राण्यांचे वर्तनही बदलते दिवसा अचानक अंधार पडल्यासारखे वाटते. कंकणाकृती सूर्यग्रहण म्हणजे आकाशातील सुंदर अग्नीचे एक कंकण आहे. हे क्वचित दिसणारे दृश्य आपल्याला निसर्गातील अचूक गणित आणि सौंदर्य दोन्ही दाखवते.

# सापाविषयी अधिक काही...



**महत्त्वाचे काही...**

**दो**न साप समोरासमोर आले आणि त्यापैकी एकाने रागाने किंवा चुकून दुसऱ्याला चावले तर काय होईल? ते स्वतःच्या विषाने एकमेकांना मारू शकतात का? चला जाणून घेऊ या.

कधीकधी साप एकमेकांना चावतात. आक्रमकता किंवा भांडणाच्या वेळी किंवा दोन नर साप एका मादीसाठी स्पर्धा करताना एकमेकांना चावतात. किंग कोब्रासारखे साप इतर सापांची शिकार करतात. तथापि, प्रत्येक प्रजाती असे करत नाही. अजगरासारखे साप इतर सापांना खात नाहीत. म्हणूनच साप कोणत्या प्रजातीचे आहे यावर ते एकमेकांना चावतात का आणि डंख केल्यास काय परिणाम होतो, हे अवलंबून असते. एकाच प्रजातीच्या सापांमध्ये विषाविरुद्ध प्रतिकारशक्ती आढळते. म्हणजेच, एका सापाने दुसऱ्या सापाला चावले तर दुसरा साप वाचू शकतो कारण त्याच्या शरीरात त्याच विषाविरुद्ध अँटीबॉडीज विकसित झाले आहेत.

तथापि, वेगवेगळ्या प्रजातींचे साप असतील तर परिस्थिती बदलू शकते. उदाहरणार्थ एखाद्या किंग कोब्राने रसेल वाइपरला चावले तर त्याचे विष प्रभावी असू शकते. परंतु काही सापांमध्ये नैसर्गिक प्रतिकारशक्ती असते. विशेषतः इतर सापांना खाणाऱ्या सापांमध्ये ती अधिक असते.

संशोधनातून दिसून आले आहे की किंग कोब्रा सारख्या सापांमध्ये इतर सापांच्या विषाविरुद्ध बरीच प्रतिकारशक्ती असते. काही सापांच्या शरीरात अँटीजन नावाचे घटक आढळतात, जे इतर सापांचे विष निष्क्रिय करतात. त्यामुळे ते केवळ चावण्यापासून वाचू शकत नाहीत, तर ते त्यांना खाऊ शकतात आणि तरीही जगू शकतात.

सापांमध्येही मारामारी होते. प्रजनन काळात, नर साप मादीसाठी आपापसात लढतात. यावेळी ते एकमेकांवर विष सोडत नाहीत तर फक्त कुस्तीसारखे लढतात. डोके वर करून ते एकमेकांना दाबण्याचा प्रयत्न करतात. ही लढाई कमी घातक आणि शक्तीप्रदर्शन जास्त आहे.

# उपयुक्त पण हानीकारक कॅडमियम

**कॅ**डमियम हे एक धातू खनिज आहे. त्याचा रंग चंदेरी पांढरा असतो. कॅडमियम हा धातू थोडा मऊ असतो. तो प्रामुख्याने जस्त या खनिजाबरोबर मिश्र स्वरूपात आढळतो. त्यामुळे जस्त काढताना त्याच्यासोबत कॅडमियम ही मिळते. कॅडमियम जमिनीच्या आत खडकांच्या थरांमध्ये सापडते. पृथ्वीच्या आत असलेल्या खडकांमध्ये विविध धातू मिसळलेले असतात.

जगात चीन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि अमेरिका या देशांमध्ये कॅडमियम मिळते. भारतातही राजस्थानमधील उदयपूर, झावर आणि रामपुरा–आगुचा भागात तर ओडिशा आणि झारखंड मध्येही जस्ताच्या खाणी आहेत. तेथे हे उपउत्पादन स्वरुपात मिळते.

खाणीतून काढलेले खडक कारखान्यात नेले जातात. तेथे प्रथम जस्त वेगळे काढले जाते आणि त्यानंतर उरलेल्या भागातून कॅडमियम वेगळे केले जाते. कॅडमियम शुद्ध करण्यासाठी उष्णतेचा वापर केला जातो. ही प्रक्रिया कारखान्यांमध्ये काळजीपूर्वक केली जाते.

कॅडमियमचे काही उपयोग आहेत. पूर्वी रिचार्ज होणाऱ्या बॅटऱ्या बनवण्यासाठी कॅडमियम मोठ्या प्रमाणात

**खनिजांची माहिती**

वापरले जात असे. तसेच कॅडमियमचा उपयोग लाल, पिवळे आणि नारिंगी रंग तयार करण्यासाठी केला जातो. याशिवाय लोखंड किंवा इतर धातूंना गंज लागू नये म्हणून त्यावर कॅडमियमचा पातळ थर दिला जातो. त्यामुळे त्या वस्तू अधिक टिकाऊ बनतात. काही विशेष यंत्रांमध्ये आणि उपकरणांमध्येही कॅडमियमचा वापर केला जातो.

हा धातू विषारी असतो. त्याचा जास्त संपर्क किंवा चुकीचा वापर आरोग्यास हानीकारक ठरू शकतो. त्यामुळे




आजकाल त्याचा वापर कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि सुरक्षित पर्याय शोधले जात आहेत.

# पराना नदी-पवित्र माता

**प**राना ही दक्षिण अमेरिकेतील एक महत्त्वाची आणि विशाल नदी आहे. ती सुमारे ४८८० किलोमीटर लांब आहे. ही नदी मुख्यतः ब्राझील, पॅराग्वे आणि अर्जेंटिना या देशांमधून वाहते आणि शेवटी रिओ दे ला प्लाटा या अटलांटिक महासागराच्या मोठ्या खाडीला मिळते.

पराना नदीचा उगम ब्राझीलमध्ये परानाइबा आणि ग्रांदे या दोन नद्यांच्या संगमातून होतो. त्यानंतर ती दक्षिणेकडे वाहत जाते. प्रवासात ती काही भागात ब्राझील–पॅराग्वे आणि पुढे पराग्वे–अर्जेंटिना यांच्यात सीमा तयार करते. अर्जेंटिनामधील रोसारियो आणि ब्युनोस आयर्स ही शहरे याच नदीच्या किनाऱ्यावर वसली आहेत. ब्राझीलमधील फोज दो इग्वासू या शहरात प्रसिद्ध इग्वासु धबधबा आहे. तर ग्वायरा सारखी ठरते.



तिच्यावर बांधलेले इटायपु धरण ब्राझील आणि पॅराग्वे यांच्या सीमेवर आहे आणि जगातील सर्वात मोठ्या जलविद्युत प्रकल्पांपैकी एक आहे. तसेच यासिरेता हे धरण अर्जेंटिना आणि पॅराग्वे देशांदरम्यान आहे. पराना नदी

काही औद्योगिक क्षेत्रेही या नदीच्या काठावर आहेत. पराना ही नदी वाहतुकीसाठी खूप उपयोगी आहे. बोटी आणि मोठी जहाजे या नदीमार्गातून धान्य, सोयाबीन, मका, खनिजे आणि इतर माल वाहून नेतात. त्यामुळे ती दक्षिण अमेरिकेतील महत्त्वाचा व्यापार मार्ग

**गोष्टी नद्यांच्या**

परिसरात सुपीक जमीन असल्यामुळे शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. सोयाबीन, गहू, मका यासारखी पिके येथे घेतली जातात. नदीत विविध प्रकारचे मासे आढळतात. त्यामुळे मत्स्यव्यवसायही महत्त्वाचा आहे.

# प्राण्यांची आवड आहे?



**पा**ळीव प्राण्यांचेही खूप लाड होतात बरं का. त्यांच्यासाठी वेगळी सलून्स असतात. इथे प्राण्यांचे केस, नखं कापली जातात. त्यांना आंघोळ घातली जाते. प्राण्यांना छान सजवलं जातं. ही सगळी कामं पेट ग्रुमर करतात. तुम्हालाही प्राणी आवडत असतील तर पेट ग्रुमिंगचं करीअर निवडायला हरकत नाही. पेट ग्रुमिंगच्या करीअरविषयी...

आपल्यापैकी प्रत्येकाला छान दिसायचं असतं. त्यासाठी आपण पार्लरमध्ये जातो. छान छान कपडे घालतो. मेक अप करतो. पाळीव प्राण्यांचेही असेच लाड होतात. त्यांचं ग्रुमिंग केलं जातं. पेट ग्रुमिंगमध्ये

**कोण होणार?**

कुत्रा आणि मांजरांना तयार केलं जातं. काहीजण घोडा आणि सश्यांनाही ग्रूम करतात. माणसांप्रमाणे प्राण्यांचीही नीट काळजी घ्यावी लागते. प्राण्यांचे मालकही त्यांची विशेष काळजी घेण्यावर भर देतात. म्हणून पेट ग्रूमर्सच्या मागणीत वाढ होत आहे. पाळलेल्या प्राण्याचं आरोग्य चांगलं रहावं, तो प्राणी छान दिसावा असं अनेकांना वाटत असतं.

पेट ग्रुमिंगमधलं करीअर वाटतं तितकं सोपं नाही. प्राणी कसे वागतील याचा काहीच नेम नसतो. त्यामुळे त्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. काही प्राणी तुम्हाला अजिबात सहकार्य करत नाहीत. दुसऱ्यांना हात लावू देत नाहीत. अशा वेळी त्यांना कसं हाताळायचं हे ठरवावं लागतं. पेट ग्रुमिंगचं करीअर निवडण्यासाठी पाळीव प्राण्यांच्या गरजा जाणून घ्यायला हव्यात.

**माहीत असावे...**

## जिम्नॅस्टिक्समध्ये रस वाढवा

जिम्नॅस्टिक्स हा उत्तम खेळ असून त्याचे विविध प्रकार आहेत. ॲक्रोबिक, ऱ्हिदमिक, आर्टिस्टिक असे प्रकार पहाणं रंजक ठरतं.



ऑलिम्पिकमध्येही जिम्नॅस्टिक्सचा समावेश असतो. ऑलिम्पिक ही जगातली सर्वात मोठी क्रीडास्पर्धा आहे. ऑलिम्पिकमध्ये जिम्नॅस्टिक्सच्या फ्लोर एक्सरसाइज, वॉल्ट पोमेल हॉर्स, रिंग्ज, पॅरेलल बार्स, हॉरिझाँटल बार, अनइव्हन बार आणि बॅलन्स बीमसह विविध प्रकारच्या आठ इव्हेंट्स होतात. महिला आणि पुरुष जिम्नॅस्ट्ससाठी वेगवेगळ्या इव्हेंट्सचं आयोजन केलं जातं. बॅलन्स बीम आणि अनइव्हन बार्स या इव्हेंट्स फक्त महिलांसाठीच असतात.

**ट्राय इट**

## यम्मी चॉकलेट पिझ्झा



तुम्हाला चॉकलेट आणि पिझ्झा दोन्ही आवडतं. मग चॉकलेट आणि पिझ्झा या दोन्हींचं कॉम्बिनेशन केलं तर...म्हणजे चॉकलेट पिझ्झा बनवला तर.. यासाठी अर्धा कप चोको चिप्ज, आक्रोड, बदाम आणि काजूचे तुकडे अर्धा कप, पाव कप दूध, पिझ्झा बेस, एक चमचा बटर, चमचाभर साखर, सजावटीसाठी अननस किंवा स्ट्रॉबेरीचे काप हे साहित्य घ्या. हा पिझ्झा मायक्रोवेव्हमध्ये बनवायचा आहे. यासाठी मायक्रोवेव्ह १० मिनिटं प्रीहिट करून घ्या. आता एका भांड्यात चॉकलेट, ड्रायफ्रूट्स, बटर आणि दूध एकत्र करून घ्या. यानंतर हे मिश्रण पिझ्झा बेसवर पसरवा. मग पिझ्झा बेस मायक्रोवेव्हमध्ये ठेऊन बेक करून घ्या. पिझ्झा तयार होईल.

**प्राणीजगत**

## रंगीबेरंगी ट्रेगोपॅन

ट्रेगोपॅन हा अनोखा पक्षी आहे. त्याची चोच छोटी आणि पंख गोलाकार असतात. त्यांची शेपटीही बरीच छोटी असते.




जगभरात ट्रॅगोपॅनच्या पाच प्रजाती आहेत. यापैकी 'वेस्टर्न ट्रेगोपॅन' हा हिमाचल प्रदेशचा राज्य पक्षी आहे. वेस्टर्न ट्रेगोपॅनला 'वेस्टर्न हॉर्न फिजेन्ट'ही म्हणतात. वेस्टर्न ट्रेगापॅनची संख्या खूप कमी झाली आहे.

**योगा टाईम**

## करा वृक्षासन

तुम्ही योगासनांचे लाभ जाणताच. योगामुळे शरीराचं संतुलन राखलं जातं. तसंच एकाग्रताही वाढते.



एकाग्रता वाढवण्यासाठी तुम्ही वृक्षासन करू शकता. हे आसन करण्यासाठी ताठ उभे रहा. आता उजवा पाय दुमडून पाऊल डाव्या मांडीवर ठेवा. दोन्ही हात वर न्या आणि हातांचे पंजे जोडून काही सेंकद ताठ उभे रहा. वृक्षासनामुळे पाय आणि पाठीचा कणा बळकट होतो.

# निवडक

## भारतीय हवाईदलात ओंकारची ऐतिहासिक कामगिरी

**सुधागड-पाली :** सुधागड तालुक्यातील आपटवणे गावचा सुपुत्र कु. ओंकार शरद चोरघे याची भारतीय हवाईदलामध्ये airman (Medical assistant) पदासाठी संपूर्ण भारतातून प्रथम क्रमांकाने निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



ओंकारच्या या यशामुळे सुधागड तालुक्याचा गौरव वाढला असून गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. भारतीय हवाईदलात वैद्यकीय सहाय्यक पदावर प्रथम क्रमांकाने निवड होणे ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे. त्याच्या पुढील सेवाकार्यासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी संपूर्ण सुधागड तालुका तसेच रायगड जिल्ह्यातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.



## प्लेऑफसाठी चार संघात 'काँटे की टक्कर'

**मुंबई :** आयपीएल २०२६ मध्ये चेन्नई सुपर किंग्सचा प्रवास संपला आहे. गट फेरीतील आपला शेवटचा सामना गुजरात टायटन्सकडून गमावल्यामुळे हा संघ स्पर्धेतून बाहेर पडला. लखनौ सुपर जायंट्स आणि मुंबई इंडियन्सनंतर, सीएसके प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणारा तिसरा संघ ठरला आहे. आरसीबी, हैदराबाद आणि गुजरात टायटन्स आधीच प्लेऑफसाठी पात्र ठरले आहेत. पंजाब किंग्स, कोलकाता नाइट रायडर्स, राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्स अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत आहेत. राजस्थान रॉयल्सने १३ सामन्यांमधून १४ गुण मिळवले आहेत. या संघाने आपला शेवटचा सामना २ मे रोजी वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळणार. तो सामना जिंकल्यास संघ थेट प्लेऑफमध्ये पोहोचेल. त्यांना इतर कोणत्याही सामन्यांच्या निकालाची चिंता करण्याची गरज नाही. जर ते हरले, तर त्यांना आशा करावी लागेल की पंजाबचा पराभव होईल आणि दिल्ली कॅपिटल्स केकेआरला थोड्या फरकाने हरवेल.पहिल्या सात सामन्यांनंतर पंजाब किंग्सकडे १३ गुण होते. उर्वरित १३ सामन्यांनंतरही त्यांचे १३ गुण कायम आहेत. त्यांना आपला शेवटचा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागेल. याव्यतिरिक्त , राजस्थान आपला शेवटचा सामना हरावा अशी आपण आशा केली पाहिजे. जरी केकेआरने आपला शेवटचा सामना जिंकला तरी, त्यांच्या आघाडीचे अंतर कमी झाले पाहिजे. पंजाबचा सामना शनिवारी लखनौ सुपर जायंट्सशी होणार आहे. केकेआरला आपल्या पहिल्या सहा सामन्यांमध्ये एकही विजय मिळवता आला नाही. त्यानंतरच्या सात सामन्यांपैकी सहा सामने जिंकल्यामुळे संघाचे १३ गुण झाले आहेत. या हंगामातील शेवटच्या गट सामन्यात ते दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध खेळतील. संघाने हा सामना जिंकलाच पाहिजे आणि राजस्थान रॉयल्स मुंबईकडून हरावा अशी आशा केली पाहिजे. जरी पंजाब किंग्सने लखनौविरुद्ध विजय मिळवला तरी, आघाडीचे अंतर कमीच राहील.दिल्ली कॅपिटल्सचा नेट रन रेट -०.८७१ आहे. संघाने आपल्या शेवटच्या सामन्यात केकेआरला मोठ्या फरकाने हरवलेच पाहिजे. शिवाय, पंजाब किंग्स आणि राजस्थान रॉयल्स आपले शेवटचे सामने हरावेत अशी आपण आशा केली पाहिजे.प्लेऑफचा निर्णय २४ मे ला ठरणार आहे, कारण आता संपूर्ण खेळ राजस्थान रॉयल्सवर अवलंबून असणार आहे. जरी उर्वरित तीन संघ पंजाब किंग्स, कोलकाता नाइट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स, त्यांचे शेवटचे सामने जिंकले, तरीही २४ मे पर्यंत त्यांच्या प्लेऑफमधील जागा निश्चित होणार नाहीत.

## मॅन्यूएल न्यूएर फुटबॉलमधून निवृत्त

**बर्लीन :** चाळीस वर्षीय गोलरक्ष मॅन्यूएल न्यूएर याचे जर्मनीच्या फुटबॉल संघात पुनरागमन झाले आहे. मुख्य प्रशिक्षक ज्युलियन नगेल्समन यांनी जर्मनीच्या २६ खेळाडूंच्या नावांची घोषणा गुरुवारी केली. फुटबॉल विश्वकरंडकासाठी जर्मनीचा संघ जाहीर करण्यात आला.



युरोपियन चॅम्पियनशिपनंतरमॅन्यूएल न्यूएर याने निवृत्तीचा निर्णय घेतला होता. मात्र विश्वकरंडकासाठी त्याला निवृत्तीचा निर्णय मागे घ्यावा लागला आहे.जर्मनीचा फुटबॉल संघ : गोलरक्षक : ओलिव्हर बाऊमन, मॅन्यूएल न्यूएर, लेक्झँडर न्यूबेल. बचावफळी : जोशुआ किमीच, निको श्लोटरबेक, नथानिएल ब्राऊन, डेव्हिड रॉम, वाल्देमर अँटॉन, पास्कल ग्रो, अँटोनियो रुडीगर, मलीक थियॉ, जॉनाथन ताह. मधली फळी : जमाल मुसीयाला, जेमी लेव्हलिंग, लेक्झँडर पावलोविच, नदीम अमिरी, फेलिक्स एनमेचा, अँजेलो स्टीलर, लिऑन गोरेटझ्का. आक्रमक फळी : केई हॅवर्ट्झ, डेनिझ उंडाव, मॅक्सिमिलीयन बेयर, फ्लोरियन विर्ट्झ, निक वॉल्टमेड, लेनार्ट कार्ल, लेरॉय सेन.ई गटात समावेशजर्मनी फुटबॉल संघाचा ई गटात समावेश आहे. या गटामध्ये जर्मनीसमोर आयव्हरी कोस्ट, कुराकाओ व इक्केडोर या देशांचे आव्हान असणार आहे. जर्मनी संघाने आतापर्यंत चार वेळा विश्वकरंडकाच्या जेतेपदावर मोहर उमटवली आहे. यंदा त्यांचा संघ पाचव्या विजेतेपदासाठी प्रयत्नांची शिकस्त करताना दिसणार आहे.

## 'विश्वचषकासाठी संघ चांगल्या फॉर्मात'

**मुंबई :** पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी उपकर्णधार स्मृती मंधाना हिने सांगितले की, या १२ देशांच्या स्पर्धे साठी सर्व खेळाडू उत्तम फॉर्मात आहेत. महिला टी-२० विश्वचषक स्पर्धा १२ जूनपासून इंग्लंड अयेथे खेळवली जाणार असून, वनडे विश्वचषक विजेत्या भारताचा पहिला सामना १४ जून रोजी पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. मुंबईत पी सेफ या महिला केअर ब्रँडने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत मनधाना म्हणाली की, भारतीय महिला संघाचे सराव शिबीर चांगले झाले आहे.

# चेन्नईचा गुजरातकडून दारुण पराभव

## || आयपीएल २०२६ मधील प्रवास संपुष्टात || बीसीसीआयची संघावर कठोर कारवाई

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

२१ मे रोजी अहमदाबाद येथे झालेल्या सामन्यात गुजरातने पाच वेळच्या विजेत्या चेन्नईला ८९ धावांनी पराभूत केले. हा दोन्ही संघांमधील शेवटचा सामना होता. या सामन्यात, गुजरात टायटन्सने आपल्या पहिल्या तीन फलंदाजांच्या अर्धशतकांच्या जोरावर ४ विकेट्स गमावून २२९ धावांचा डोंगर उभा केला. कर्णधार शुभमन गिलने ६४, तर सलामीवीर साई सुदर्शनने ८४ धावा केल्या. त्यानंतर जोस बटलरने २७ चेंडूमध्ये ५७ धावा करून संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. लक्ष्याचा पाठलाग करताना, चेन्नईचा संघ १३.४ ओव्हरमध्ये १४० धावांवर सर्वबाद झाला. ८९ धावांच्या या लाजिरवाण्या पराभवामुळे ते आयपीएल २०२६ मधून बाहेर पडले.



गुजरात टायटन्सकडून झालेल्या लाजिरवाण्या पराभवामुळे चेन्नई सुपर किंग्स आयपीएल २०२६ च्या प्लेऑफच्या शर्यतीतून अधिकृतपणे बाहेर पडली आहे. या पराभवातून संपूर्ण संघ सावरण्याआधी त्यांना चेन्नईला आणखी एक धक्का बसला आहे. गुजरातविरुद्धच्या सामन्यानंतर, बीसीसीआयने कठोर कारवाई करत चेन्नई सुपर किंग्सच्या कर्णधारासह संपूर्ण संघाला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. या सामन्यात संघाने स्लो ओव्हर रेटचा नियम मोडल्यामुळे ही शिक्षा देण्यात आली.

आचारसंहितेनुसार हा चेन्नई संघाचा या हंगामातील दुसरा स्लो ओव्हर रेट गुन्हा आहे. यापूर्वी, हंगामातील १८ व्या सामन्यात, संघ निर्धारित वेळेत २० ओव्हर टाकण्यात अपयशी ठरला होता. आचारसंहितेच्या नियम २.२२ नुसार, जो किमान ओव्हर रेटशी संबंधित आहे. सामन्यानंतर, बीसीसीआयच्या आयपीएल नियामक परिषदेने संघाविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची घोषणा केली. कर्णधार ऋतुराज गायकवाडला २४ लाखांचा दंड ठोठावण्यात आला. केवळ कर्णधारावरच नव्हे, तर प्लेइंग इलेव्हन आणि इम्पॅक्ट प्लेयर्ससह उर्वरित खेळाडूंना त्यांच्या सामना शुल्काच्या २५ टक्के रक्कम दंड ठोठावण्यात आला आहे.


### सीएसकेची निराशाजनक कामगिरी

ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्सने खेळलेल्या १४ सामन्यांपैकी संघाला केवळ सहा सामने जिंकता आले. १२ गुण आणि -०.३४५ च्या खराब नेट रन रेटमुळे सीएसके प्लेऑफसच्या रेसमधून बाद झाला आहे. गेल्या सलग तीन हंगामात चेन्नईला आयपीएल प्लेऑफमध्ये स्थान मिळवता आलेले नाही. चेन्नईने २०२३ मध्ये शेवटचे आयपीएल विजेतेपद एम.एस. धोनीच्या नेतृत्वाखाली जिंकले होते.

# नेमारचे ब्राझील संघात पुनरागमन

**| रियो दी जेनेरियो | वृत्तसंस्था |**

नेमार ज्युनियर याचे तब्बल तीन वर्षांनंतर ब्राझीलच्या फुटबॉल संघात पुनरागमन करण्यात आले आहे. ११ जून ते १९ जुलै यादरम्यान अमेरिका, कॅनडा व मेक्सिको येथे फुटबॉल विश्वकरंडकाचा थरार रंगणार आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धे साठी ब्राझीलच्या संघाची घोषणा करण्यात आली. मुख्य प्रशिक्षक कार्लो अँसीलोटी यांनी ब्राझीलच्या २६ खेळाडूंच्या नावांवर शिक्कामोर्तब केले. नेमार ज्युनियर हा २०२३ पासून ब्राझील संघातून खेळलेला नाही, पण अजूनही त्याला देशासाठी खेळायचे होते. वारंवार याबाबत त्याने इच्छाही व्यक्त केली होती. मात्र, मार्च महिन्यात झालेल्या मैत्रीपूर्ण सामन्यातून त्याला वगळण्यात आले होते. मागील वर्षभरात त्याला दुखापतीचाही



सामना करावा लागला होता. आता नेमारच्या समावेशामुळे सर्व शंकाकुशंकांना पूर्णविराम लागला आहे. दरम्यान, नेमार याच्यासह विनिशियर ज्युनियर, राफीन्हा, मारकिन्होस, गॅब्रियल मार्टीनेली व गॅब्रियल मगालहेस या खेळाडूंनाही ब्राझीलच्या संघात संधी देण्यात आली आहे.

४० वर्षीय मॉडरिच क्रोएशियामध्ये४० वर्षीय अनुभवी मिडफिल्डर लुका मॉडरिच याची क्रोएशियाच्या संघामध्ये निवड करण्यात आली आहे. झ्लॅटको डालिच या मुख्य प्रशिक्षकांनी क्रोएशियन संघाची घोषणा केली. लुका मॉडरिच याने आतापर्यंत १९६ आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून, आता त्याला २०० आंतरराष्ट्रीय सामने खेळता येणार आहेत. लुका मॉडरिच याच्यासह इवान पेरिसिच, मारीयो पॅसालिच, आंद्रेज क्रामारिच या अनुभवी खेळाडूंनी क्रोएशिया संघातील आपले स्थान कायम राखले आहे. ब्राझीलचा संघ : गोलरक्षक : एलिसन, एडरसन, वेवरटन. बचावफळी : लेक्स सँड्रो, ब्रेमर, डॅनिलो, डगलस सँटोस, गॅब्रियल मगालहीस, इबानेज, लियो परेरा, मारकिन्होस, वेस्ली. मधली फळी : ब्रुनो गिमारेस, सेसमिरो, डॅनिलो सँटोस, फॅबिन्हो, लुकास पॅकेटा. आक्रमक फळी : एंड्रीक, गॅब्रियल मार्टीनेली, इगॉर थियागो, लुईझ हेनरीक, मथेयस कुन्हा, नेमार ज्युनियर, राफीन्हा, रेयान, विनिशियस ज्युनियर..क्रोएशियाचा संघ : गोलरक्षक : डॉमिनिक लिवाकोविच,डॉमिनिककोटारस्की, इवॉर पांडुर, कार्लो लेटिका. बचावफळी : जोस्को ग्वारदियोल, दुए सालेटा सार, जोसिप सुतालो, जोसिप स्टॅनिसिच, मरीन पोंग्रासिच. मार्टीन एर्लिच, लुका वुस्कोविच, इवान स्मोलसिच. मधली फळी : लुका मॉडरिच, मॅटिओ कोवासिच, मारीयो पॅसालिच, निकोला व्लासिच, लुका सुचिच, मार्टीन बटुरिना, ख्रिस्तीयन जाकिच, पीटर सुचीच, निकोला मोरो, टोनी फ्रुक, लोवरो मजेर, ड्रियन सेगेसिच, लुका स्तोज्कोविच. आक्रमक फळी : इवान पेरिसिच, आंद्रेज क्रामारिच, एंटे बुदिमीर, मार्को पासालिच, पीटर मुसा, इगॉर मॅटानोविच, फ्रँजो इवानोविच. डियॉन ड्रेना बेल्जो यांचा संघात समावेश आहे.

# मालविकाची विजयी सलामी

**| नवी दिल्ली| वृत्तसंस्था|**

मलेशिया मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत भारतासाठी मालविका बनसोड आणि अश्मिता चालिहा यांनी आशेचा किरण दाखवला. महिला एकेरीत दोघींनी दमदार विजय मिळवत दुसऱ्या फेरीत धडक मारली. मात्र, अन्य भारतीय खेळाडूंची कामगिरी निराशाजनक ठरली. शस्त्रक्रियेनंतर पुनरागमन करणाऱ्या मालविका बनसोडने जर्मनीच्या जागतिक क्रमवारीतील ५२ व्या क्रमांकाच्या वोन ली हिच्यावर तीन गेममध्ये मात केली.

मालविकाने २१-१७, १६-२१, २१-९ अशा फरकाने सामना जिंकत आपला लढाऊ बाणा दाखवून दिला. आता दुसरया फेरीज तिच्यासमोर



डेन्मार्कच्या आठव्या मानांकित लाइन होजमार्प जासफल्ड्टचे आव्हान असेल. अश्मिता चालिहानेही इंडोनेशियाच्या थलिता रामधनी वीर्यवान हिला सरळ गेममध्ये २१-१६, २१-१३ असे पराभूत करत पुढील फेरी गाठली. आता तिची गाठ मलेशियाच्या गोह जिन वीशी पडणार आहे.

## एमसीएच्या क्रिकेट समितीवर राजीव कुलकर्णी

**मुंबई :** क्रिकेट संघटनेच्या सुधारणा समितीमध्ये राजीव कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये राजीव यांच्याबरोबर संगीता काटवरे आणि प्रीती डिमरी यांचीही नियुक्ती यावेळी करण्यात आली आहे. एमसीएने क्रिकेट सल्लागार म्हणून भारताचे माजी कर्णधार आणि निवड समिती अध्यक्ष दिलीप वेंगसरकर आणि डायना एडल्जी यांचीही पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे.

# कॅरम बोर्डवर प्रशांत मोरेचा दबदबा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

लोकमान्य मंडळ बँक्वेट हॉल, माटुंगा येथे संपन्न झालेल्या २३ व्या मुंबई महापौर चषक जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात माजी विश्व् विजेत्या रिझर्व्ह बँकेच्या प्रशांत मोरेने शिवतारा कॅरम क्लबच्या राहुल सोलंकीला २४-२०, २५-९ असे सरळ दोन सेटमध्ये हरवून या गटाचे विजेतेपद पटकवले.

मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन आयोजित आणि लोकमान्य सोसायटी माटुंगा यांच्या लोकमान्य मंडळाच्या सहकार्याने




आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेतील महिला एकेरीच्या अंतिम फेरीत ए. के फाऊंडेशनच्या सोनाली कुमारीने जैन इरिगेशनच्या मिताली पाठकवर २५-०, २२-११अशी मात करत विजय संपादन केला. अंतिम फेरीत प्रवेश करण्यापूर्वी प्रशांतने मुंबई महानगरपालिकेच्या विकास धरियाला २१-१४, २५-१३ असे तर राहुलने डी. के. सी. च्या सिद्धांत वाडवलकरवर २२-९, २-२१ व २५-९ अशी मात केली होती. महिलांमध्ये अंतिम फेरीत प्रवेश करताना सोनालीने जैन इरिगेशनच्या ऐशा साजिद खानचा २४-१३, २५-० असा व मितालीने शिवतारा कॅरम क्लबच्या सिमरन शिंदेचा २१-७, १२-२५ व २५-२ असा पराभव केला होता.

विजेत्या खेळाडूंना मनोहर गोडसे, नविन जोशी, सुहास बेडेकर, यतिन ठाकूर, अरुण केदार, संजय देसाई अजित सावंत यांच्या हस्ते रोख पारितोषिक व चषक देऊन गौरविण्यात आले.

## डब्ल्यूटीसी पॉइंट टेबलमध्ये मोठा उलटफेर

**नवी दिल्ली :** बांगलादेश संघाने कसोटी मालिकेत पाकिस्तानला धूळ चारली. दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत पाकिस्तानला चारीमुंड्या चीत करत बांगलादेशने पाकिस्तानसह भारतीयसंघाला ही झटका दिला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप खेळल्या गेलेल्या या कसोटी मालिकेत बांगलादेशने पाकिस्तानचा पराभव केला. त्यामुळे डब्ल्यूटीसी रँकिंगमध्ये भारतीय संघ पाचव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर घसरला आहे. तर पाकिस्तानचा संघ सातव्या स्थानावरून आठव्या स्थानावर घसरला आहे.

## बुमरासाठी बीसीसीआयचा मास्टर प्लॅन

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

बीसीसीआयने आपला कसोटी आणि वन डे संघ दोन दिवसांपूर्वी जाहीर केला. पण यामध्ये भारताचा यॉर्कर किंग जसप्रीत बुमराचे यामध्ये नाव नाही. बुमरा शेवटचा एकदिवसीय सामना खेळून दोन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. त्यामुळे बुमरा आता कसोटी किंवा वन डे क्रिकेट खेळणार की नाही, असे प्रश्न समोर यायला लागले आहेत. पण बीसीसीआयने बुमरासाठी मास्टर प्लॅन आखला असल्याचे आता समोर आले आहे. बुमरा आता आयपीएल खेळत आहे, त्यामुळे त्याला विश्रांती मिळावी यासाठी अफगाणिस्तानविरुद्धच्या वन डे आणि कसोटी मालिकेसाठी संघात स्थान दिलेले नाही. बुमरासाठी आता २०२७ चा विश्वचषक हे लक्ष्य ठेवले आहे. त्यापूर्वी होणाऱ्या इंग्लंड मालिकेमध्ये त्याचे पुनरागमन होऊ शकते, अशी माहिती बीसीसीआयमधील सूत्रांनी दिली आहे.

# किक बॉक्सिंग स्पर्धेत मुंबईचे वर्चस्व

**| मुंबई | प्रतिनिधी |**

पुण्याच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मिलिटरी स्कूलमध्ये पार पडलेल्या राज्यस्तरीय किक बॉक्सिंग निवड स्पर्धेत मुंबई शहर किक बॉक्सिंग संघटनेच्या खेळाडूंनी धमाकेदार कामगिरी करत १० सुवर्ण, १० रौप्य आणि १२ कांस्यांसह ३२ पदकांची कमाई केली. या स्पर्धेत पॉइंट फाईट, लाईट कॉन्टॅक्ट, किक लाईट,



लो किक, फुल कॉन्टॅक्ट आणि क्रिएटिव्ह फॉर्म अशा विविध प्रकारांमध्ये मुंबई शहराच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय रेफरी विघ्नेश मुरकर आणि उमेश मुरकर यांचे मार्गदर्शन लाभले. या जोरदार कामगिरीमुळे मुंबई शहरातील खेळाडू आता राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी सज्ज झाले आहेत.

**केंद्रीय मंत्रालयाचे ऐतिहासिक पाऊल** | **पाच वर्षांचा तुरुंगवास; दोन लाखांपर्यंत दंड**

# भारतामध्ये 'डोपिंग' ठरणार गुन्हा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. भारतातील खेळाडूंच्या उत्तेजक सेवनाच्या वाढत्या प्रमाणावर लक्ष देता आता 'डोपिंग' हा या देशामध्ये गुन्हा ठरणार आहे. तसेच खेळाडूंना बंदी घातलेली औषधे पुरवणाऱ्या व्यक्तींना आता पाच वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

खेळाडूंना डोपिंगसाठी बंदी घातलेली औषधे देणे, पुरवणे,



विकणे किंवा त्यासाठी मदत करणे हा गुन्हा मानला जाईल. दोषी आढळल्यास संबंधित व्यक्तीला पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास, दोन लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. यामध्ये जाणूनबुजून बंदी असलेली औषधे लिहून देणाऱ्या डॉक्टरांनाही कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

भारतातील डोपिंगविरोधी कायद्यात पुन्हा बदल करण्याची तयारी सुरू आहे. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने या प्रस्तावित दुरुस्त्या आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या आहेत. नागरिकांकडून सूचना आणि हरकती मागवण्यात आल्या असून, त्यासाठी १८ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. प्रशिक्षक, व्यवस्थापक, सहकारी खेळाडू किंवा खेळाडूंशी थेट संपर्कात असलेली कोणतीही व्यक्ती जर बंदी असलेल्या औषधांच्या पुरवठ्यात सहभागी असल्याचे आढळले, तर तिच्यावर गुन्हा दाखल केला जाईल.

ऑलिंपिक यजमानपदाची भारत सलग तीन वर्षे जागतिक डोपिंग यादीत अव्वल राहिला आहे. यामुळे २०३६ ऑलिंपिक यजमानपदाच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेला याचा फटका बसू शकतो.

> "लोकांच्या अभिप्रायानंतर हे विधेयक संसदेतल्या आगामी पावसाळी अधिवेशनात मांडले जाईल. 'डोपिंग' आता फक्त खेळातील नियमभंग राहिलेला नाही. त्यामागे संघटित रॅकेट तयार झाले आहे. आतापर्यंत फक्त औषधे घेणाऱ्या खेळाडूंवर कारवाई होत होती, पण आता पुरवठा करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याची गरज आहे."
> -मनसुख मांडविय
> क्रीडामंत्री

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)